# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## मार्च २०२५

# ई वार्ता




LEGEND

| | | |
|---|---|---|
| | Central Campus of MPKV | |
| | Agril. Research Station | 27 |
| | Post Graduate Institute | 01 |
| | Agril. Technology Information Centre | 01 |
| | Regional Extension Centre | 04 |
| | District Extension Centre | 05 |
| | Krishi Vigyan Kendra | 04 |
| | Agricultural Tech. School | 08 |
| | Agricultural Engg. College | 02 |
| | Agricultural College | 08 |
| | Horticulture College | 02 |
| | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७८२/२०२५

मफुकृवि ई वार्ता
मार्च २०२५

वर्ष :५, अंक क्रं. : ५१, मार्च, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्याकडे राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कुलगुरु पदाचा अतिरिक्त पदभार



**दि. ४ मार्च, २०२५.** राज्याचे राज्यपाल यांच्या मान्यतेने अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्याकडे राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा कुलगुरु पदाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. डॉ. शरद गडाख यांची अकोला कृषि विद्यापीठाचे कुलगुरु होण्यापूर्वी ते महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये संशोधन व विस्तार शिक्षण संचालकपदी कार्यरत होते. डॉ. शरद गडाख हे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे ते १९ सप्टेंबर, २०२२ पासून कुलगुरु या पदावर कार्यरत आहेत. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये त्यांच्या कार्यकाळात विविध पदावंर काम केलेले आहे. त्याच्या कार्यकाळात विद्यापीठाची स्वयंपूर्णतेकडे वाटचाल सुरु झाली. त्यांनी नाविन्यपूर्ण उपक्रम महात्मा फुले कृषि विद्यापीठात राबविले. यामध्ये विद्यापीठाची पडीक जमीन लागवडीखाली आणने, विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक जिल्ह्यात विद्यापीठाचे विक्री केंद्र सुरु करणे, फळबागेखाली लागवड क्षेत्र वाढविणे, विविध फळांचे प्रात्यक्षिक प्रकल्प, सेंद्रिय शेती प्रकल्प नाविन्यपूर्ण उपक्रम त्यांनी राबविले. यामुळे विद्यापीठाच्या महसुली उत्पादनात वाढ होवून शेतकऱ्यांना त्यांच्या जिल्ह्यातच विद्यापीठाचे उत्पादने उपलब्ध झाली. तसेच शेतकरी प्रथम आणि मॉडेल व्हिलेज संकल्पनेमुळे कृषि विस्तारामध्ये नविन मापदंडे स्थापीत झाली.

अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठात त्यांनी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले. यामध्ये त्यांनी हजारो हेक्टर पडिक जमीन लागवडीखाली आणली. प्रक्षेत्रावर मोठ्या प्रमाणात शेततळे करुन कायम स्वरुपी सिंचनाची व्यवस्था केली. यामुळे जास्तीत जास्त जमीन सिंचनाखाली आल्यामुळे फळबागेखाली क्षेत्र वाढले. विविध वाणांच्या बिजोत्पादनाचे क्षेत्र वाढविले. संशोधन केंद्रांचे बळकटीकरण केले. मॉडेल व्हिलेज, शेतकरी शास्त्रज्ञ मंच स्थापन करुन कृषि विस्ताराला नविन दिशा दिली. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक परिक्षा मंच, उद्योजकता विकास मंच, हायटेक ॲग्री मंच यासारखे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले.

राहुरी येथील त्यांच्या कार्यकाळात त्यांनी शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्यात दैदिप्यमान कार्य केलेले आहे. त्यांनी विविध पिकांचे १९ वाण विकसित केलेले आहेत. यामध्ये वांग्याचा एक, कारल्याचे पाच, काकडीचे दोन, वालचे एक, ज्वारीचे नऊ आणि नागलीचा एक वाण विकसित केलेले आहे. त्यांचे आत्तापर्यंत ६८ संशोधन लेख, ३६ तांत्रिक लेख, १२८ विस्तार लेख आणि विविध प्रकाशने प्रसिध्द झालेली आहेत. त्यांच्या शिक्षण, संशोधन आणि कृषि विस्तारातील अभुतपूर्व योगदानामुळे त्यांना जागतिक स्थरावरील एक पुरस्कार, राष्ट्रीय पातळीवरील तीन पुरस्कार आणि राज्य पातळीवरील सहा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. डॉ. शरद गडाख यांच्या प्रदीर्घ अनुभवामुळे राज्यपाल महोदयांनी त्यांना राहुरी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त पदभार दिला आहे. या निवडीमुळे राज्याच्या सर्व स्तरातून डॉ. शरद गडाख यांचे अभिनंदन होत आहे.

## कुलगुरु डॉ. शरद गडाख यांनी स्विकारला महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा पदभार

**दि. ५ मार्च, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात डॉ. पंजाबराब देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांची महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कुलगुरुपदी निवड झाल्याबद्दल स्वागत व सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, कुलसचिव डॉ. नितिन दानवले, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, हाळगाव येथील कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे, काष्टी येथील छत्रपती



शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नांदगुडे, अकोला कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण विभाग प्रमुख डॉ. नितिन कोष्टी, पशुसंवर्धन विभाग प्रमुख डॉ. शेषराव चव्हाण, जनसंपर्क अधिकारी डॉ. किशोर बिडवे, अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या श्रीमती विजयाताई आंबाडे व कृषिभुषण सुरसिंग पवार उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. शरद गडाख मार्गदर्शन करतांना म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठात काम करण्याचा पूर्वीचा अनुभव चांगला आहे. येथील कामाचे वातावरण चांगले असून विद्यापीठाची प्रगती कशी होईल हे पाहण्याबरोबरच विद्यापीठ सर्व दृष्टीने सक्षम करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करु. कार्यालयीन काम करतांना सकारात्मकता, कामाचा दृष्टीकोन, ज्ञान व समर्पणाची भावना महत्वाची असते. त्यासाठी सर्वांना बरोबर घेवून शेतकरी केंद्रबिंदू मानून काम करु. महात्मा फुले कृषि विद्यापीठ नव्या उंचीवर घेवून जावू. अकोला विद्यापीठामध्ये कुलगुरु म्हणुन काम करत असतांना तेथील अधिकारी व कर्मचारी यांना विश्वासात घेवून तसेच अधिकच्या जबाबदाऱ्या देवून काम केल्याचे फळ आज दिसत आहे. यावर्षी ३ हजार एकर क्षेत्रावर बिजोत्पादनाचा कार्यक्रम राबविल्यामुळे विद्यापीठाच्या महसुली उत्पादनात ४० कोटींपर्यंत वाढ झालेली आहे. सोयाबीन तसेच हरभरा या पिकांची उत्पादकता चार पटीने वाढली. शेतकरी आत्महत्याग्रस्त गावांमध्ये मॉडेल व्हिलेजची संपल्पना राबविल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली.

यावेळी डॉ. साताप्पा खरबडे मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की विद्यापीठाला तसेच पाच महाविद्यालयांना नुकतेच 'अ' मानांकन मिळाले असून उर्वरीत मालेगांव, कराड, मुक्ताईनगर व हाळगांव या कृषि महाविद्यालयांना 'अ' मानांकन मिळण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. कुलगुरु डॉ. शरद गडचळ यांच्या नेतृत्वात कृषि शिक्षणात नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येतील. डॉ. गोरक्ष ससाणे आपल्या मनोगतात म्हणाले की कुलगुरु डॉ. गडाख सर यांच्या संकल्पनेनुसार विस्तार कार्य करतांना मॉडेल व्हिलेजसारखी संकल्पना राबविण्याबरोबरच बियाण्यांच्या बाबतीत शेतकऱ्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी बियाणे व्हिलेजची संकल्पना राबवावी लागेल. कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण, संशोधन व विस्ताराला नवी दिशा मिळेल. डॉ. विठ्ठल शिर्के यावेळी म्हणाले की कुलगुरु डॉ. शरद गडाख यांनी कुलगुरु म्हणुन डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठात केलेल्या कामाची दखल घेवून राज्यपाल महोदयांनी त्यांची निवड राहुरी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी केलेली आहे. कुलगुरु डॉ. शरद गडाख राहुरी विद्यापीठामध्ये काम करतांना त्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पना राबवून विद्यापीठाचे नाव नक्कीच मोठे करतील. याप्रसंगी मिलिंद ढोके, डॉ. रविंद्र बनसोड, डॉ. किशोर बिडवे, सुरसिंग पवार, श्रीमती विजयाताई आंबाडे व अहिल्यानगर येथील खते बि बियाणे असोशिएशनचे सचिव दिलीप कोकणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नितीन दानवले यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुलेंच्या प्रतीमेचे पुजन करुन व दिवंगत कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून व श्रध्दांजली अर्पन करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी तर आभार डॉ. सचिन सदाफळ यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी व परिसरातील प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.

## फुले कृषि-२०२५ व सावित्री जत्रा या शाश्वत शेती प्रदर्शन आणि प्रात्यक्षिकांचे कृषि महाविद्यालय पुणे येथे आयोजन

**दि. ६ मार्च, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत कृषि महाविद्यालय पुणे, कृषि विभाग, भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन, कृषि

मफुकृवि ई वार्ता
मार्च २०२५

तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्था, पुणे, जिल्हा परिषद पुणे आणि नॅकॉफ इंडिया लि. नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या फुले कृषि – २०२५ व सावित्री जत्रा या शाश्वत शेती प्रदर्शन आणि प्रात्यक्षिकांचे आयोजन कृषि महाविद्यालय पुणे येथे करण्यात आले. सदर प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे तथा डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख होते. या कार्यक्रमाला पुणे जिल्ह्याचे विभागीय आयुक्त श्री. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र डूडी, स्मार्ट प्रकल्प संचालक डॉ. हेमंत वसेकर, पुणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गजानन पाटील, कार्यकारी परिषद सदस्य डॉ. पी. जी. इंगोले व श्री संजीव भोर, अतिरिक्त महासंचालक यशदा तथा अध्यक्ष माजी विद्यार्थी संघटना श्री. शेखर गायकवाड, कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता (कृषि) डॉ. सताप्पा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, कृषि महाविद्यालय पुणे चे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. नितीन दानवले, नॅकोफ नवी दिल्ली चे प्रतिनिधी श्री. गोविंद डाके, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा पुणे च्या प्रकल्प संचालीका श्रीमती शालिनी कडू उपस्थित होते.





यावेळी कुलगुरू डॉ. शरद गडाख मार्गदर्शन करतांना म्हणाले की सन १९५० मध्ये आपल्या देशाची लोकसंख्या ३५ कोटी होती व अन्नधान्याचे उत्पादन ५० मिलियन टन होते. फळे व भाजीपालाचे उत्पादन २३ मिलियन टन होते व दुधाचे उत्पादन १३ मिलियन टन होते. सध्याला आपली लोकसंख्या १४२ कोटी असून अन्नधान्याचे उत्पादन ३३१ मिलियन टन, फळे व भाजीपाल्याचे उत्पादन ३५१ मिलियन टन आणि दुधाचे उत्पादन २३१ मिलियन टन आहे. फळे व भाजीपाला उत्पादनामध्ये आपण जगात दुसरे असून दूध उत्पादनामध्ये आपण जगात पहिले आहोत. अन्नधान्य मध्ये आपण स्वयंपूर्ण झालेलो आहोत. याचे श्रेय शेतकरी, कृषि शास्त्रज्ञ व धोरण करते यांना जाते. आता ग्राहक जागरूक झाला आहे. ग्राहक अंशमुक्त उत्पादन मागत आहे. यामुळे अंश मुक्त उत्पादनाला बाजारपेठेत मागणी वाढत आहे. या फुले कृषि प्रदर्शन व सावित्री जत्रेमुळे अंशमुक्त शेतीची जनजागृती होणार आहे. यामुळे शेतकरी विद्यार्थी आणि समाजातील इतर घटकांना अंशमुक्त शेतीचे महत्त्व कळून त्याची मोठी बाजारपेठ निर्माण होणार आहे. या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास जागृत होऊन उद्योजकतेचे बीज रुजविले जाणार आहे. कृषि विद्यापीठ इथून पुढे विद्यार्थ्यांना दिशा देण्याचे काम करणार आहे. या अशा उपक्रमांमुळे उद्योजकतेला चालना मिळून विद्यार्थी नोकरी घेणारा ऐवजी नोकरी देणारा होणार आहे.

विभागीय आयुक्त श्री. चंद्रकांत फुलकुंडवार मार्गदर्शन करताना म्हणाले, कृषि विद्यापीठातील तंत्रज्ञान हे शेतकऱ्यांचा आधारस्तंभ आहे. कृषि तंत्रज्ञानाचा आधार घेऊन शाश्वत शेती आणि अंशमुक्त अन्नधान्य उत्पादनाकडे जाणे गरजेचे आहे. शेतकरी बांधवांचा विकास हाच आपला विकास आहे. जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र डूडी म्हणाले, कृषिमध्ये अमर्यादित रासायनिक औषधांच्या वापरामुळे कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. यासाठी अंशमुक्त व सेंद्रिय शेती उत्पादनाची आता गरज वाढली आहे. सेंद्रिय उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध झाली तरच शेतकरी सेंद्रिय शेती करतील. सेंद्रिय उत्पादनांना बाजारपेठ मिळावी यासाठी शासन स्तरावर प्रयत्न होत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गजानन पाटील मार्गदर्शन करताना म्हणाले पुणे जिल्ह्यामध्ये २७ हजार बचत गट असून या बचतगटांना दोन लाख महिला जोडलेल्या आहेत. शेती कामामध्ये महिलांचे मोठे योगदान आहे. सेंद्रिय शेतीच्या उपक्रमांमध्ये ग्रामीण महिला व शेतकरी महिलांचा सहभाग घेतला तर सेंद्रिय शेतीला मोठी चालना मिळणार आहे. याप्रसंगी श्री. शेखर गायकवाड आणि श्री. गोविंद डाके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी मान्यवरांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले आणि शिवार फेरी केली. या शिवार फेरीमध्ये ५० पेक्षा जास्त रेसिड्यू फ्री पिकांची प्रात्यक्षिके मान्यवरांनी पाहिले. या वेळी प्रदर्शनास भेट देतेवेळी त्यांनी कृषि उत्पादकांच्या स्टॉलला भेटी दिल्या आणि बचत गटांच्या महिलांबरोबर संवाद साधला.





या कार्यक्रमाला राहुरी येथील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रवींद्र बनसोड, कृषि तंत्रज्ञान शिक्षणचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, उद्यान विद्या महाविद्यालय, पुणे चे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद पाटील, कृषि विद्यापीठांतील विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक वर्ग, कर्मचारी, जिल्हा परिषदेचे अधिकारी, कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी, प्रगतशील शेतकरी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रदर्शनाच्या आयोजनामध्ये स्मार्ट प्रकल्प, नैसर्गिक शेती मिशन, कृषि संसाधन निधी आणि माजी कृषि विद्यार्थी संघटना यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महानंद माने यांनी केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. पल्लवी सुर्यवंशी यांनी केले तर आभार श्रीमती शालिनी कडू यांनी मानले.

## फुले कृषि २०२५ शाश्वत शेती प्रदर्शनास खासदार श्रीमती सुनेत्रा पवार यांची भेट





**दि. ८ मार्च २०२५.** कृषि महाविद्यालय, पुणे येथे कृषि विभाग, भारत सरकार, महाराष्ट्र शासन, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्था, पुणे जिल्हा परिषद, पुणे आणि नेक ऑफ इंडिया लिमिटेड, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने फुले कृषि २०२५ व सावित्री यात्रा या शाश्वत शेती प्रदर्शन आणि प्रात्यक्षिकांचे आयोजन कृषि महाविद्यालय पुणे येथे करण्यात आले होते. या प्रदर्शनास खासदार श्रीमती सुनेत्रा पवार यांनी भेट दिली. याप्रसंगी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ महानंद माने, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गजानन पाटील, पुणेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका श्रीमती शालिनी कडू उपस्थित होते.

यावेळी खा. श्रीमती सुनेत्रा पवार आपल्या मार्गदर्शनात म्हणाल्या की शेती ही आपली संस्कृती,अर्थव्यवस्था आणि जीवनशैली यांचा गाभा आहे. आजही आपल्या देशातील ५० टक्के पेक्षा अधिक जनता शेतीवर अवलंबून आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्याला पारंपारिक शेतीत सुधारणा करणे आवश्यक आहे. आज कृषि क्षेत्रामध्ये अनेक महत्त्वाचे प्रश्न समोर आहेत. त्यातील एक महत्त्वाचा विषय म्हणजे खाद्यपदार्थांमध्ये व मातीमध्ये असलेले रासायनिक अवशेष. हे अवशेष, जे प्रामुख्याने कीटकनाशके खते आणि तणनाशकांमुळे होतात व ते मानवी आरोग्य, जैवविविधता आणि निसर्गाच्या दीर्घकालीन उपजाऊपणाला धोका निर्माण करतात. याबाबतीत खऱ्या अर्थाने संशोधन

होणे आवश्यक आहे. कृषि महाविद्यालय, पुणे येथे आयोजित करण्यात आलेले हे शाश्वत शेतीवर आधारित असणारे कृषि प्रदर्शन आणि विविध प्रात्यक्षिके हे महात्मा फुले कृषि विद्यापीठाने उचललेले अतिशय महत्त्वाचे पाऊल आहे. तसेच भारतीय कृषि क्षेत्रामध्ये महिलांचे योगदान सुद्धा अमूल्य आहे. ग्रामीण भागात ७५ टक्के पेक्षा अधिक महिला थेट शेतीशी संबंधित आहेत. शेतीची मशागत, बियाणे पेरणी, तणनियंत्रण, पीक काढणी, दुग्ध व्यवसाय, पशुपालन आणि बाजार व्यवस्थापन यामध्ये त्यांची महत्त्वाची भूमिका आहे. महिला शेतकऱ्यांचा विकास हा संपूर्ण कृषि क्षेत्राच्या प्रगतीसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने या कृषि प्रदर्शनाच्या माध्यमातून महिलांना अधिक संधी उपलब्ध करून त्यांच्या कार्याची दखल घेतली आहे ही बाब कौतुकास्पद आहे असे गौरवोद्गार खासदार सुनेत्रा पवार यांनी काढले. यावेळी लखपती दीदी, ड्रोन दीदी व सायबर सुरक्षा प्रशिक्षण देण्यात आलेल्या महिलांचा सत्कार करण्यात आला. तसेच खेड, आंबेगाव, भोर, शिरूर, मुळशी, बारामती, दौंड आणि पुरंदर येथील विविध बचत गटांना कर्ज वितरण करण्यात आले.

## फुले कृषि २०२५ शाश्वत शेती प्रदर्शनास कृषि आयुक्त श्री. सुरज मांढरे यांची भेट





**दि. ८ मार्च २०२५.** कृषि महाविद्यालय, पुणे येथे आयोजित केलेल्या फुले कृषि महोत्सव २०२५ व शाश्वत शेती प्रदर्शनास महाराष्ट्र राज्याचे कृषि आयुक्त श्री. सुरज मांढरे यांनी भेट दिली. यावेळी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, कृषि संचालक श्री. अशोक किरणाल्ली व श्री. रफिक नाईकवाडी उपस्थित होते. यावेळी श्री. सुरज मांढरे अपल्या मार्गदर्शनात म्हणाले की शेतीमध्ये रासायनिक निविष्ठांचा अतिवापर केल्यामुळे अन्नसाखळी बिघडली आहे. लोकांचे आरोग्य धोक्यात येत चालले आहे. रोज विष पोटात जात आहे. कॅन्सरचे प्रमाण जास्त वाढले आहेत. यावर उपाय आणि नियंत्रण ठेवण्यासाठी आपण जे अन्न खातो ते अंशमुक्त, रसायनमुक्त असायला हवे. प्रत्यक्ष पाहिले तर नक्कीच विश्वास बसतो म्हणून पोकळ प्रचार करण्यापेक्षा कृषि विद्यापीठाने या प्रदर्शनाच्या माध्यमातून निर्माण केलेले शाश्वत शेतीवर आधारित असे तुलनात्मक प्रयोग शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणे अत्यंत आवश्यक आहे. त्यातून शेतकऱ्यांना निश्चितच योग्य मार्गदर्शन आणि दिशा मिळेल. कोणत्या प्रकारचं उत्पादन घेणे आवश्यक आहे आणि मार्केटसाठी कोणते उत्पादन योग्य आहे याबाबतीतील योग्य मार्गदर्शन घेतले तर घेणाऱ्याला योग्य माल मिळेल आणि देणाऱ्याला योग्य मोबदला मिळेल. यासाठी कृषि विद्यापीठातलं तंत्रज्ञान आणि कृषि विभागाच्या माध्यमातून विस्तार प्रशासन यांचा सुवर्णमध्य साधला तर निश्चितच याचा सर्वांना फायदा होईल. या वेळी कृषि महोत्सवामध्ये सहभागी झालेल्या शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच स्मार्ट प्रकल्पांतर्गत आणि डॉ. पंजाबराव देशमुख जैविक मिशनअंतर्गत स्थापित झालेल्या शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या स्टॉलची पाहणी त्यांनी केली.

## फुले कृषि २०२५ शाश्वत शेती प्रदर्शनास पद्मश्री श्रीमती राहीबाई पोपेरे यांची भेट

**दि. ८ मार्च, २०२५.** कृषि महाविद्यालय, पुणे येथे आयोजीत केलेल्या फुले कृषि २०२५ व सावित्री जत्रा या प्रदर्शनात तिसऱ्या दिवशी महिला दिनानिमित्त पद्मश्री श्रीमती राहीबाई पोपेरे यांनी महिला, शेतकरी, विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला. याप्रसंगी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजू आमोलिक, गणेश खिंडचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. विष्णू गरांडे तसेच डॉ. प्रमोद चौधरी, डॉ. अविनाश गोसावी, डॉ. सुहास उपाध्ये उपस्थित होते. यावेळी पद्मश्री श्रीमती राहीबाई पोपेरे उपस्थितांना मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की माती चांगली तर अन्न चांगले आणि अन्न चांगले तर आपले आरोग्य चांगले. माती चांगली ठेवण्यासाठी

मफुकृवि ई वार्ता
मार्च २०२५

वर्ष :५, अंक क्रं. : ५१, मार्च, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





शेतकऱ्यांनी रासायनिक खत व विषारी औषध वापरू नये. या चांगल्या मातीमध्ये देशी बियाणे लावा व आपली पुढची पिढी सुदृढ करा. देशी वाण व मातीचे संवर्धन केले तरच आपली पुढची पिढी आपली निरोगी व सुदृढ राहील. आपण जे चांगले होते ते हरवून बसलो. या चायनीज व हायब्रीड वाणांमध्ये काही दम नाही. ज्यात चमक आहे त्यात धमक नाही. आपल्या भरड धान्यामध्ये खूप ताकद आहे. इथून पुढे आपण भरडधान्य मेळावे भरवा. प्रत्येकाच्या घरात देशी वाणाची परसबाग हवी जेणेकरून आपल्या ताटातील भाजी विषमुक्त असेल.

या प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिवशी तांत्रिक सत्रामध्ये नाबार्डचे वरिष्ठ व्यवसाय विकास व्यवस्थापक श्री. महेश भोयर यांनी शेतकरी उत्पादक कंपन्यासाठी कर्जपुरवठा आणि योजना, प्रजापिता ईश्वरी विश्वविद्यालयाच्या बी के शारदा बहणजी यांनी योगिक शेती व शेतीमधील महिलांचा सहभाग, तळेगाव दाभाडे येथील प्रगतशील शेतकरी महिला सौ. शुभांगी दळवी यांनी फुल शेतीमधील व्यवसायाच्या संधी, पुणे येथील राष्ट्रीय बीजोत्पादन संस्थेचे विभागीय व्यवस्थापक श्री. एस. सी. चिमूरकर यांनी बीज उत्पादनाचा परवाना व वितरण प्रणाली यावर शेतकरी विद्यार्थी यांना सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी पद्मश्री राहीबाई पोपेरे यांच्या हस्ते श्रीमती सुभद्रा जयवंत कुरकुटे यांनी लिहिलेले जात्यावरच्या ओव्या या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. या तांत्रिक सत्रांचे प्रास्ताविक डॉ. विष्णू गरांडे यांनी तर सूत्रसंचालन डॉ. सुहास उपाध्ये यांनी केले.

## कृषि विज्ञान केंद्रांची कृती कार्यशाळा संपन्न





**दि. ५ मार्च, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि कृषि तंत्रज्ञान अवलंबन संशोधन संस्था, विभाग–८, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १८ कृषि विज्ञान केंद्रांची दोन दिवसीय कृती कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु कुलगुरु डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, कुलसचिव डॉ. नितिन दानवले व पुणे येथील कृषि तंत्रज्ञान अवलंबन संशोधन संस्थेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. शाकिर अली सैद उपस्थित होते.

वर्ष :५, अंक क्रं. : ५१, मार्च, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

यावेळी कुलगुरु डॉ. शरद गडाख मार्गदर्शन करतांना म्हणाले की शेतकऱ्यांना शाश्वत उत्पादन मिळून त्यांचे उत्पन्न दुप्पट व्हावे हे कृषि विज्ञान केंद्रांचे उद्दीष्ट्य असले पाहिजे. कृषि विद्यापीठाच्या विकसीत तंत्रज्ञानाचे मोठ्या प्रमाणावर प्रात्यक्षिक घेणे हे कृषि विज्ञान केंद्रांचे महत्वाचे कार्य आहे. पीक प्रात्यक्षिके, पीक संग्रहालय आणि आद्यरेखा प्रात्यक्षिके हे कृषि विज्ञान केंद्राचे शक्तीस्थान आहे. शेतकरीभिमुख विस्तार कार्य करुन कृषि विज्ञान केंद्रांनी आपली ओळख निर्माण करावी.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे मार्गदर्शन करतांना म्हणाले की बदलत्या हवामानात तग धरणारे तंत्रज्ञान विद्यापीठाने विकसीत केले असून त्याचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणावर कृषि विज्ञान केंद्रांनी करावा. कृती कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यापीठातील विविध पिकातील अद्ययावत संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहचवावे. कृषि विज्ञान केंद्रांच्या शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांच्या समस्यांवर अभ्यास करुन पीक पध्दतीचे नियोजन करावे असे यावेळी ते म्हणाले. डॉ. विठ्ठल शिर्के यावेळी म्हणाले की कृषि विज्ञान केंद्रांचा प्रत्येक कार्यक्रम हा शेतकरीभिमुख असावा. विद्यापीठ विकसीत तंत्रज्ञान हे कृषि विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावर शेतकऱ्यांना पाहण्यासाठी ठेवावे. डॉ. शाकिर अली सैद म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विविध पिकांमध्ये संशोधन करुन शेतकऱ्यांसाठी मोठे योगदान दिले आहे. कृषि विज्ञान केंद्राने पीक उत्पादन तंत्रज्ञान, यांत्रिकीकरण व मुल्यवर्धनावर भर द्यावा. कृषि विज्ञान केंद्रांचे ३० टक्केपर्यंत सर्व उपक्रम हे महिलांसाठी असावेत. प्रत्येक हंगामासाठी पीक संग्रहालय तयार करावे जेणेकरुन कृषि विज्ञान केंद्रास भेट देणारे शेतकरी ते तंत्रज्ञान बघतील व त्यांचा त्यावर विश्वास बसेल.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. भगवान देशमुख यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील एकूण १८ कृषि विज्ञान केंद्रांचे प्रमुख शास्त्रज्ञ उपस्थित होते. या दोन दिवसीय कार्यशाळेत कृषि विज्ञान केंद्रांचा मागील वर्षाचा आढावा व पुढील वर्षाचे संशोधन व विस्ताराचे नियोजन निर्धारीत करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी केले तर आभार डॉ. सचिन सदाफळ यांनी मानले.

## ग्रामीण समृद्धीसाठी नावीन्यपूर्ण संशोधन व उद्योजकता: कृषि दृष्टिकोन या विषयावर कार्यक्रम संपन्न




**दि. १ मार्च, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे ग्रामीण समृद्धीसाठी नावीन्यपूर्ण संशोधन व उद्योजकता: कृषि दृष्टिकोन या विषयावरील महाराष्ट्र सोसायटी ऑफ अग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स, अकोला व कृषि अर्थशास्त्र विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय परिसंवादाच्या समारोपप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख होते. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र हिले, महाराष्ट्र सोसायटी ऑफ अग्रिकल्चर इकॉनॉमिक्सचे अध्यक्ष डॉ. डी. एल. साळे, संस्थेचे सेक्रेटरी डॉ. आर. जी. देशमुख, अकोला येथील सोसायटीचे कोषाध्यक्ष डॉ. एस. सी. नागपुरे, विविध कृषि विद्यापीठातील डॉ. सचिन मोटे, डॉ. तोरणे व डॉ. एन. व्ही. शेंडे उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरु डॉ. शरद गडाख म्हणाले की अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये शेती उत्पादनात मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. या वाढीमध्ये शेती व्यवसायाबरोबरच शेतीला दुय्यम व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय, एकात्मिक शेती, विविध शेती पद्धती, सेंद्रिय शेती यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होत आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनास योग्य भाव मिळणे गरजेचे आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना योग्य असे मार्गदर्शन झाले पाहिजे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करणे आवश्यक आहे. शेतीमध्ये उद्योजक तयार झाले

पाहिजेत. यासाठी कृषिचे शिक्षण घेतलेले विद्यार्थी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. या कृषिच्या पदवीधरांनी उद्योजक बनावे व शेती क्षेत्राला नवी दिशा द्यावी. यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की या परिसंवादातून तयार झालेल्या शिफारशींचा फायदा कृषि व्यवसायासाठी होणार आहे. या शिफारशींमुळे कृषि व्यवसाय अधिकाधिक फायदेशीर करण्याबरोबरच उद्योजकता विकास, नाविन्यपूर्ण विपणन धोरण, मूल्यवर्धन आणि कृषि प्रक्रिया तसेच हवामान स्मार्ट शेती आणि डिजिटल शेती हे विषय शेतीसाठी महत्त्वाचे आहेत. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. आर. आर. निरगुडे यांनी या राष्ट्रीय परिसंवादाचा सारांश व निष्कर्ष सादर केला. यावेळी कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या शुभहस्ते विविध पाच थीममधील शोधनिबंधांचे सादरीकरण तसेच पोस्टर सादरीकरणांमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या विजेत्या विद्यार्थी तसेच विभागातील शास्त्रज्ञ, कर्मचारी यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. शोधनिबंध सादरीकरणामध्ये अनुक्रमे डॉ. जे. टी. दोरगे, डॉ. गौरव शर्मा, डॉ. रचना बंसल, श्री. पी. व्ही. मुंडे, डॉ. ए. जी. आमले, डॉ. डी. जे. सानप, डॉ. संजय सपकाळ, डॉ. एस. एम. कवीभारती, डॉ. के. वाय. खैरनार, कुमारी रिया परमार यांना तर पोस्टर सादरीकरणामध्ये के. पी. पाटील, एच. व्ही. हर्षित गौडा, ऋत्विका मकवाना, डॉ. पल्लवी कोळेकर, के. एस. होरा, श्रेयस डिंगोरे, साक्षी गजभिये, एस. आर. लावण्य, आर. निधीश्री व साक्षी देऊळकर यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र सोसायटी ऑफ अग्रिकल्चरल इकॉनॉमिक्सचे विविध स्मरणिका पुरस्कार व स्मृती पुरस्कार तसेच तज्ञ व्याख्याते यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय सपकाळ यांनी तर आभार डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी मानले. या दोन दिवसीय परिसंवादासाठी देशभरातील कृषि विद्यापीठे आणि इतर प्रमुख संस्थांमधून सुमारे ६०० पेक्षा जास्त शास्त्रज्ञ आणि विद्यार्थी सहभागी झाले होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात जागतीक जल दिनाचा कार्यक्रम संपन्न



**दि. २८ मार्च, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय आणि भारतीय कृषि अभियांत्रिकी संस्था, राहुरी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतीक जल दिनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोल्याचे कुलगुरु डॉ. शरद गडाख होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन वॉटर संस्थेचे संचालक इंजि. संदिप जाधव उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड, कुलसचिव डॉ. नितीन दानवले, काष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नांदगुडे व कृषि यंत्रे व शक्ती अभियांत्रिकी विभाग प्रमुख तथा भारतीय कृषि अभियांत्रिकी संस्थेचे सचिव डॉ. सचिन नलवडे व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. शरद गडाख म्हणाले की २०२५ जागतीक जल दिनाची थीम हिमनदी संवर्धन आहे. पृथ्वीतलाचा ७० टक्के भाग हा पाण्याने व्यापला आहे. या ७० टक्क्यापैकी ३ टक्के हा गोड्या पाण्याचा साठा आहे. या गोड्या पाण्याच्या साठ्यातून फक्त ०.५ टक्के पाणी भुपृष्ठावर उपलब्ध स्वरुपात आहे. दिवसेंदिवस हे पाणी कमी होत आहे. या पाण्याचा महत्वाचा स्त्रोत हिमनद्या आहेत. उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करणे गरजेचे आहे. यासाठी डिजीटल ॲग्रीकल्चर, कृत्रिम बुध्दीमत्ता, स्मार्ट शेती, सूक्ष्म सिंचन या आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने पाण्याचे संवर्धन करुया. प्रमुख मार्गदर्शन करतांना इंजि. संदिप जाधव म्हणाले मागील

पाच वर्षात सगळ्यात जास्त हिमनद्यांचे बर्फ वितळले आहे. असेच जर सुरु राहिले तर २१ व्या शतकात सर्व बर्फ वितळण्याच्या स्थितीत राहिल. पाण्याच्या अतिवापरामुळे दोन दशकात जमिनीतील पाण्याची पातळी दोन मिटर खाली गेली आहे. आजुनही देशातील १६ करोड जनतेला स्वच्छ पिण्याचे पाणी मिळत नाही. यासाठी शेती व इतर क्षेत्रात पाण्याचा ताळेबंद गरजेचा आहे. आता वेळ आली आहे शेती, माती, पाणी, शेतकरी यांच्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. निसर्गाचा ऱ्हास मनुष्याने केला आहे, म्हणुन निसर्गाच्या संवर्धनाची जाबाबदारी मनुष्याचीच आहे. याप्रसंगी डॉ. गोरक्ष ससाणे आणि डॉ. विठ्ठल शिर्के यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रविंद्र बनसोड यांनी केले. याप्रसंगी गेट परिक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी श्री. सुरज गडगे, श्री. सोहन मोरे आणि श्री. विशाल हराळ यांचा कुलगुरुंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी पदव्युत्तर महाविद्यालय, कृषि अभियांकित्री महाविद्यालयाचे विद्यार्थी, अधिकारी, शास्त्रज्ञ, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनील फुलसावंगे यांनी तर आभार डॉ. सचिन नांदगुडे यांनी मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा भारतीय मानक ब्यूरो, पूणे व राजाराम बापू पाटील तंत्रज्ञान संस्था यांच्याबरोबर सामंजस्य करार



**दि. २४ मार्च, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा केंद्र शासनाच्या भारतीय मानक ब्यूरो, पुणे व इस्लामपूर येथील राजाराम बापू पाटील तंत्रज्ञान संस्था यांच्याबरोबर सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख उपस्थित होते. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, पुणे येथील भारतीय मानक ब्यूरोचे संचालक डॉ. एस. डी. राणे, उपसंचालक श्री. अक्षय कुटे, इस्लामपूर येथील राजाराम बापू तंत्रज्ञान संस्थेचे प्रमुख डॉ. एम. व्ही. पिसाळ, संशोधन व विकास विभागाचे समन्वयक डॉ. एस.डी. पाटील, पदव्युत्तर व आचार्य विभागाचे संयोजक डॉ. एस.एस. गावडे, डॉ. पी. बी. देसाई, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड व विद्यापीठाचे नोडल अधिकारी डॉ. एम.आर. पाटील उपस्थित होते. यावेळी सामजंस्य करारावर डॉ. विठ्ठल शिर्के यांनी विद्यापीठाच्या वतीने तर भारतीय मानक ब्यूरोचे संचालक डॉ. एस.डी. राणे व राजाराम बापू तंत्रज्ञान संस्थेचे प्रमुख डॉ. एम.व्ही. पिसाळ यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

याप्रसंगी कुलगुरु डॉ. शरद गडाख म्हणाले की भारतीय मानक ब्यूरो व इस्लामपूर येथील राजाराम बापू पाटील तंत्रज्ञान संस्थेबरोबर होणारे दोन्ही सामंजस्य करार शेतकरी व विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्वाचे आहेत. हे कृषि विद्यापीठ स्थापन होऊन ५७ वर्ष झाली आहेत. या ५७ वर्षात विद्यापीठाने ३०६ सुधारीत वाण, १८६६ तंत्रज्ञान शिफारशी व ५१ कृषि यंत्र अवजारे विकसीत केले आहेत. भारतीय मानक ब्यूरो यांच्या सामंजस्य करारामुळे संशोधीत तंत्रज्ञानाचे मापदंड ठरविण्यास मदत होईल. शाश्वत शेतीमध्ये कृत्रिम बुध्दीमत्तेच्या वापरासंबंधी संशोधनाला चालना मिळणार आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व भारतीय मानक ब्यूरो यांच्यामधील झालेल्या सामंजस्य करारानुसार शेतकरी व शेतकरी उत्पादक संघ, विद्यार्थी व संशोधक यांच्यासाठी कृषि क्षेत्राशी संबंधीत आधुनिक कृषि प्रात्यक्षिक फार्म स्थापन करणे हा असून एकत्रितपणे प्रशिक्षणे व कमी कालावधीचे प्रात्यक्षिके, प्रशिक्षणे व सेमीनार आयोजीत करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व राजाराम बापू पाटील तंत्रज्ञान संस्था यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार ड्रोन तंत्रज्ञानच्या सहाय्याने पिकांचे सर्वेक्षण करणे, काटेकोर शेती, स्वयंचलीत पाणी व्यवस्थापन, अपारंपारीक उर्जा स्त्रोतांचा वापर, काढणी पश्चात तंत्रज्ञान, माती व पाणी व्यवस्थापन, शेतीसाठी यंत्र मानवाचा वापर तसेच कृषि क्षेत्रातील टाकावू पदार्थांचा पुर्नवापर, प्रक्रियायुक्त कृषि मालाची प्रत सुधारणे,

मफुकृवि ई वार्ता
मार्च २०२५

अन्न प्रदार्थांची गुणवत्ता टिकविण्यासाठी उष्णतेचा वापर, पर्यावरणास अनुकुल अशा पुर्नवापर व विघटनशील घटकांचा वापर या संबंधीचे संशोधन करणे हा या सामंजस्य कराराचा हेतू आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विक्रम कड यांनी केले तर आभार डॉ. बाबासाहेब भिटे यांनी मानले.

## बियाणे विभागाच्या रसवंतीचे आणि नर्सरीचे उद्घाटन





**दि. १४ मार्च, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील बियाणे विभागाने नव्याने सुरु केलेल्या रसवंतीगृह व नर्सरीचे उद्घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोल्याचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विद्यापीठाचे संचालक संशोधन डॉ. विठ्ठल शिर्के, संचालक विस्तार शिक्षण डॉ. गोरक्ष ससाणे, कुलसचिव तथा प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. नितीन दानवले, नियंत्रक तथा उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील व कुलगुरूंचे तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. शरद गडाख म्हणाले की बियाणे विभागाचे बियाणे विक्री केंद्रात बियाणे व्यतिरिक्त सूक्ष्म अन्नद्रव्य, जैविक खते, विविध फळझाडांची रोपे व इतर कृषि विद्यापीठ उत्पादित निविष्ठांची विक्री सुरू होणार आहे. याव्यतिरिक्त विक्री केंद्रालगत रसवंतीगृह सुरू करण्यात येत आहे. या रसवंतीगृहामध्ये विद्यापीठाने खास उसाच्या रसासाठी विकसित केलेला फुले १५०१२ या वाणापासून रस तयार करून विक्रीस उपलब्ध राहणार आहे. हा रसासाठी उसाचा वाण इतर रसवंतीगृहांना सुद्धा विक्रीसाठी उपलब्ध राहील. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. विठ्ठल शिर्के म्हणाले कुलगुरूंच्या संकल्पनेतून शेतकऱ्यांना एकाच ठिकाणी सर्व काही उपलब्ध व्हावे यासाठी विद्यापीठाच्या गेटलगत बियाणे विक्री केंद्रात विद्यापीठ उत्पादित निविष्ठा व नर्सरीतील रोपे विक्रीसाठी उपलब्ध करून देत आहोत. याचा सर्व शेतकरी वर्गाने फायदा घ्यावा. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक कुलसचिव तथा प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. नितीन दानवले यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार डॉ. कैलास गागरे यांनी मानले. या कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा दुधी भोपळ्याचा सुधारीत वाण राष्ट्रीय पातळीवर प्रसारीत

**दि. १० मार्च, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प (भाजीपाला पिके) या योजनेची वार्षिक आढावा बैठक दि. ३ ते ५ मार्च, २०२५ रोजी पंजाब कृषि विद्यापीठ, लुधियाना (पंजाब) येथे संपन्न झाली. या बैठकीसाठी पंजाब कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सनबिर सिंग घोंसाल, दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे सहसंचालक डॉ. संजय सिंग, लुधियाना येथील पंजाब कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. ए. एस. धट, वाराणसी येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद–भारतीय भाजीपाला संशोधन संस्थेचे प्रकल्प समन्वयक डॉ. राजेश कुमार, लुधियाना येथील पंजाब कृषि विद्यापीठाचे उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. टी. एस. धिल्लोन, दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे ए.डी.जी. डॉ. सुधाकर पांडे, वाराणसी येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद–भारतीय भाजीपाला संशोधन संस्थेचे संचालक डॉ. एन.राय, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के. ई. लवांडे व देशातील वेगवेगळ्या राज्यातील ६० प्रकल्पाचे एकुण ४०० शास्त्रज्ञ आणि राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या भाजीपाला संशोधन प्रकल्पाचे डॉ. बी. टी. पाटील, डॉ. शर्मिला शिंदे, प्रा. चिमाजी बाचकर व डॉ. शालीग्राम गांगुर्डे उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी वर्ष :५, अंक क्रं. : ५१, मार्च, २०२५



या बैठकीमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वित भाजीपाला संशोधन प्रकल्पाच्या भाजीपाला लागवडीबाबत, बिजोत्पादन आणि पीक संरक्षणाबाबतच्या एकुण सहा शिफारशी मंजुर करण्यात आल्या. तसेच या आढावा बैठकीत महात्मा फुले कृषि विद्यापीठातील भाजीपाला संशोधन प्रकल्पाने संशोधीत केलेला दुधी भोपळ्याचा आर.एच.आर.बी.जी.-५४ (फुले गौरव) हा सुधारीत वाण राष्ट्रीय पातळीवर मध्यप्रदेश, गोवा व महाराष्ट्र या राज्यांसाठी प्रसारित करण्यात आला. हा सुधारीत वाण डॉ. बी. टी. पाटील, श्री. वाय. आर. पवार व डॉ. एस. ए. अनारसे यांनी विकसीत केला आहे. या वाणाची फळे मध्यम लांबीची (२७ ते ३० सें.मी.), दंड गोलाकार असून सरासरी फळांचे वजन ५४० ते ५५० ग्रॅम आहे. हा वाण भुरी आणि केवडा रोगास प्रतिकारक्षम असून फळांचे उत्पन्न सरासरी ४१३.०० क्वि./हे. मिळते अशी माहिती वरीष्ठ भाजीपाला पैदासकार तथा उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी. टी. पाटील यांनी दिली. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल भाजीपाला पिकांमध्ये काम करणाऱ्या सर्व शास्त्रज्ञांचे विद्यापीठातील विविध स्तरातून कौतुक होत आहे.

या उत्कृष्ट संशोधनासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, माजी कुलगुरू कै. डॉ. पी. जी. पाटील, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के आणि माजी संशोधन संचालक डॉ. एस.डी. गोरंटीवार, माजी विभाग प्रमुख डॉ. श्रीमंत रणपिसे यांचे सतत मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाले. प्रकल्पाच्या या यशस्वी वाटचालीमध्ये सर्व कामगार वर्ग, शास्त्रज्ञ, शिक्षकेतर कर्मचारी यांचा महत्वाचा सहभाग असल्याचे प्रतिपादन डॉ. बी.टी. पाटील यांनी केले.

## शास्त्रोक्त मधमाशीपालन प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



**दि. १७ मार्च, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे विद्यापीठाचा कृषि किटकशास्त्र विभाग, महाराष्ट्र शासनाचा कृषि विभाग व नवी दिल्ली येथील राष्ट्रीय मधमाशीपालन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मधुमक्षिका पालन व मध अभियान २०२४-२५ अंतर्गत दि. १७ ते २३ मार्च, २०२५ या कालावधीत शास्त्रोक्त मधमाशीपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कृषि किटकशास्त्र विभागातील परिसंवाद कक्षात झालेल्या या प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के होते. याप्रसंगी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषि किटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उत्तम कदम,

अहिल्यानगर येथील कृषि उपसंचालक श्री. सागर गायकवाड, नाशिक येथील सुकृती मधूशालेचे संचालक डॉ. तुकाराम निकम व राहुरीचे तालुका कृषि अधिकारी श्री. बापुसाहेब शिंदे उपस्थित होते.

यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के मार्गदर्शन करतांना म्हणाले की विविध पिकातील परागीभवनामध्ये मधमाशांची भूमिका ही महत्वाची आहे. परदेशात झालेल्या संशोधनानुसार एका एकरात मधमाशांच्या दोन पेट्या ठेवल्या तर त्या क्षेत्रातील धान्य उत्पादनात ५० ते ६० टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे. मधमाशांमुळे अन्नधान्याचे उत्पादन वाढून शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होतो. यामुळे मधमाशा या शेतकऱ्यांचा खरा मित्र होय. मार्गदर्शन करतांना डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले की मधमाशा या निसर्गचक्रातील महत्वाचा घटक आहे. मधमाशांद्वारे संपूर्ण निसर्गाचा समतोल राखण्याचे महत्वाचे काम होते. विविध प्रकारच्या महत्वाच्या वनस्पतींचे अस्तित्व या मधमाशांवर अवलंबून आहे. शेतीमधील युवकांना शेतीपूरक उद्योग उभारण्यासाठी मधुमक्षिकापालन हा चांगला पर्याय ठरु शकतो असे यावेळी ते म्हणाले. डॉ. तुकाराम निकम आपल्या मनोगतात म्हणाले की मधमाशी म्हणजे शेतकरी तसेच शेतीचा आत्मा होय. मधमाशी म्हणजे समृध्दी. जलसिंचनाएवढेच परागसिंचन महत्वाचे आहे. हरित क्रांतीनंतर आता मधुक्रांती होण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. श्री. सागर गायकवाड यावेळी म्हणाले की सध्या फळबागांखाली क्षेत्र वाढत आहे. या फळबागांमधून जास्तीचे उत्पादन मिळावे व त्यात सातत्य राहावे यासाठी मधुमक्षिकापालन महत्वाचे ठरणार आहे. त्यांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना या शास्त्रोक्त मधमाशीपालन प्रशिक्षणाचा जास्तीत जास्त फायदा घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. उत्तम कदम यांनी केले. यावेळी डॉ. तुकाराम निकम यांनी तयार केलेल्या मधुप्रतिज्ञेचे वाचन डॉ. नंदकुमार भुते यांनी करुन उपस्थितांना मधुप्रतिज्ञा दिली. या कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचालन डॉ. नंदकुमार भुते यांनी तर आभार डॉ. पल्लवी पाळंदे यांनी मानले. यावेळी राहुरी मंडळ कृषि अधिकारी अशोक गिरगुणे, वांबोरीचे मंडळ कृषि अधिकारी श्री. रामहरी मिसाळ, ब्राम्हणीचे कृषि सहाय्यक श्री. शुभम कदम, किटकशास्त्र विभागातील शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. या प्रशिक्षणासाठी सात तालुक्यातील शेतकरी सहभागी झाले आहेत.

## अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत जागतिक जल दिन कार्यक्रम संपन्न





**दि. २८ मार्च, २०२५.** महात्मा फुले विद्यापीठ, राहुरी अंतर्गत अखिल भारतीय समन्वित जलसिंचन व्यवस्थापन प्रकल्पाने जागतिक जल दिनानिमित्ताने अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण व कृषि साहित्य वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन मु.पो. गुंजाळे ता. राहुरी या गावामध्ये करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. विठ्ठल शिर्के बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके होते. यावेळी गुंजाळे गावचे सरपंच सौ. सीमा नवले, कार्यक्रमाचे आयोजक वरिष्ठ मृदशास्त्रज्ञ डॉ. अनिल दुरगुडे व जलसिंचन निचरा अभियांत्रिकीचे शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद पोपळे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के म्हणाले की सिंचनाचे पाणी हे कोरडवाहू विभागात तारक व बागायत क्षेत्रात अतिरिक्त वापराणे मारक होऊ शकते त्यासाठी पाण्याचे काटकसरीने नवीन आधुनिक सिंचन पद्धतींचा वापर केल्यास जामिनी क्षारपड होणार नाही व विविध पिकांचे शाश्वत उत्पादन घेता येईल. जागतिक जल दिनानिमित्ताने प्रत्येकाने जल संवर्धनाची कास धरावी. याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. प्रशांत बोडके म्हणाले की आपण सिंचनासाठी पाणी वापरतांना त्याचा ताळेबंद ठेवणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी पाण्याची बचत करण्यासाठी व

उत्पादन वाढविण्यासाठी ठिबक, तुषार, रेन पाईप, या सुक्ष्मसिंचन पध्दतींचा वापर करावा. पाणी वाचविणे म्हणजेच पाणी कमविणे. डॉ. अनिल दुरगुडे यांनी जागतिक जल दिनानिमित्ताने हिमनद्याच्या संवर्धनाबाबत माहिती सांगितली व पाण्याचे पृष्ठभागावरील व पृष्ठभागाखालील पाण्याच्या संवर्धना विषयी व नैसर्गिक भूगर्भातील पाणी पातळी वाढविण्याविषयी माहिती दिली. यावेळी उपस्थितांना जल संवर्धन करण्याची शपथ देण्यात आली. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते शेतकऱ्यांना कृषिदर्शनी, आधुनिक सिंचन पध्दतींचे साहित्य, सुक्ष्म अन्नद्रव्ये यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार दिपक नवले यांनी मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या बियाणे प्रक्षेत्रावरील कांदा (फुले समर्थ) बिजोत्पादन गुणवत्तापूर्ण व दर्जेदार



**दि. २० मार्च, २०२५.** महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना खरीप हंगामात कांदा (फुले समर्थ) बियाणे मुबलक प्रमाणात मिळावे म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली व विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या नेतृत्वाखाली तसेच कुलसचिव तथा बियाणे विभागाचे प्रमुख डॉ. नितीन दानवले यांच्या नियोजनातून बियाणे विभागाच्या प्रक्षेत्रावर मोठ्या प्रमाणात कांदा (फुले समर्थ) पिकाचे बीजोत्पादन घेण्यात आले आहे. बियाणे विभागाच्या ब, क, ड व फ विभागाच्या प्रक्षेत्रावर या बीजोत्पादन पिकाची पाहणी विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी केली. यावेळी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी. टी. पाटील, कडधान्य सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुरेश दोडके व बियाणे प्रक्षेत्र अधीक्षक प्रा. बी. टी. शेटे तसेच बियाणे विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के म्हणाले की विद्यापीठाने संशोधीत केलेल्या कांदा पिकाच्या विविध वाणांना शेतकऱ्यांची पहिली पसंती असते. पिकांच्या चांगल्या उत्पादनासाठी बियाणे दर्जेदार असणे अत्यंत महत्वाचे आहे. विद्यापीठ नेहमीच चांगल्या प्रतिचे बियाणे उत्पादन करत असून बियाणे विभागाच्या प्रक्षेत्रावरील कांदा पिकाचे (फुले समर्थ) बिजोत्पादन गुणवत्तापूर्ण व दर्जेदार आहे.

## तांदुळवाडी येथे ग्राम बीजोत्पादन कार्यक्रम संपन्न




**दि. १८ मार्च, २०२५.** महात्मा फुले विद्यापीठ, राहुरी व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राहुरी तालुक्यातील तांदुळवाडी

वर्ष :९, अंक क्रं. : ९१, मार्च, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

येथील श्री. भास्करराव पेरणे यांच्या वस्तीवर ग्राम बिजोत्पादन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे सेवानिवृत्त रोगशास्त्रज्ञ डॉ. रामचंद्र पेरेणे होते. यावेळी व्यासपीठावर महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलसचिव तथा बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नितीन दानवले, तांदुळवाडीचे सरपंच श्री. गणपत पेरणे, सोसायटीचे चेअरमन श्री. रेवननाथ पेरणे, श्री. बबनराव कोळसे, विद्यापीठाचे बीज उत्पादन आधिकारी डॉ. कैलास गागरे, महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक श्री. सुनील दौंड उपस्थित होते.

यावेळी डॉ. नितीन दानवले मार्गदर्शन करतांना म्हणाले की शेतात शुध्द बियाणे व योग्य वाणाची निवड केली तर निश्चितपणे आपल्या उत्पन्नात वाढ होते. यासाठी शेतकऱ्यांनी पायाभूत बियाणांचा वापर केला पाहिजे. श्री. सुनील दौंड यांनी बीज उत्पादनात शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींवर मार्गदर्शन केले. कृषि सहाय्यक चंद्रकात म्हसे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी श्री. बाळासाहेब पेरणे, श्री. दादासाहेब पेरणे, श्री. बाळासाहेब धसाळ, श्री. पांडुरंग पेरणे, श्री. अशोक म्हसे, श्री. शिवाजी पेरणे, श्री. मधुकर धसाळ, श्री. विकास कल्हापुरे, श्री. सोन्याबापु पेरणे, श्री. प्रल्हाद पेरणे, श्री. बाळासाहेब आघाव, श्री. उमेश पेरणे, श्री. काशिनाथ धागुडे, श्री. रामभाऊ वर्षे, श्री. मोहन खाटेकर, श्री. सुरेश तनपुरे, उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सर्जेराव पेरणे यांनी तर आभार युवराज काशीद यांनी मानले.

## कापूस सुधार प्रकल्प शेततळ्याचे जलपूजन संपन्न



**दि. २० मार्च, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथील कापूस सुधार प्रकल्पाच्या शेततळ्याचे जलपूजन करण्यात आले. या शेततळ्याचे जलपूजन विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या हस्ते पार पडले. सदरील शेततळे हे कापूस सुधार प्रकल्प येथे तयार करण्यात आले असून या शेततळ्याची लांबी ११० मीटर असून रुंदी ७४ मीटर व खोली ९ मीटर आहे. हे शेततळे एकूण ८१४० चौ. मी. असून शेततळ्याची साठवण क्षमता ७ कोटी लिटर इतकी आहे. या शेततळ्याचे खोदकाम २०१५ मध्ये सुरु झाले होते या शेततळ्यात तत्कालीन संशोधन संचालक डॉ. आर. एस. पाटील व माजी कुलगुरू डॉ. तुकाराम मोरे यांच्या संकल्पनेतून प्लास्टिक पेपर टाकण्यात आला आहे. कापूस सुधार प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावरील शेततळे हे टेलला असल्यामुळे पाटाचे पाणी पूर्ण क्षमतेने येत नसल्याने कार्यालय प्रमुख डॉ. पवन कुलवाल यांच्या मार्गदर्शनाखाली व विद्यापीठाच्या जेसीबीच्या सहाय्याने पाणी येण्यापूर्वी चर दुरुस्त करून घेतला व २० मार्च रोजी शेततळे पूर्ण क्षमतेने भरण्यात आले. या शेततळ्यामुळे प्रक्षेत्रावरील एकूण ५० हेक्टर क्षेत्रावर या तळ्याचा शाश्वत विकास पाणी देण्यासाठी उपयोग होणार आहे. तसेच प्रक्षेत्रावर कापूस भुईमूग व ज्यूट या पिकांचे प्रायोगिक चाचणी प्रयोग घेतले जातात तसेच प्रक्षेत्रावर भुईमूग, सोयाबीन, गहू, हरभरा व कांदा पिकांचे उत्पादन घेतले जाते त्यामुळे प्रक्षेत्रावरील पिकांना विहीर व नदीवरील लिफ्टने मोटारीच्या साह्याने पिकांना पाणी दिले जात होते आता शेततळे परिपूर्ण तयार झाल्याने हे शेततळे पिकांना लाभदायक ठरणार आहे.

या शेततळ्याच्या जलपूजनाप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. नितीन दानवले, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाने, कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, उद्यानविद्या विभाग विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील, डॉ. सुरेश दोडके, डॉ. सचिन सदाफळ यांच्यासह अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच परिसरातील शेतकरी श्री. सचिन शेटे, श्री. भाऊसाहेब शेटे, श्री. नंदू हरिचंद्रे उपस्थित होते. पाट पाण्याचे उत्कृष्ट नियोजन केल्यामुळे श्री. बुवासाहेब मस्के व श्री. सचिन शेटे यांचा विद्यापिठाचे संशोधन संचालक यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. विद्यापीठ व शेतकरी यांचे सलोख्याचे संबंध निर्माण करण्याचे मार्गदर्शन डॉ. विठ्ठल शिर्के यांनी केले. सदर कार्यक्रमाचे नियोजन कृषि सहाय्यक श्री. गणेश धोंडे व श्री. पी. टी. कुसळकर यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पवन कुलवाल यांनी केले व सूत्रसंचालन डॉ. नंदकुमार भुते यांनी केले व आभार श्री. पी. टी. कुसळकर यांनी मानले. सदर कार्यक्रमास परिसरातील शेतकरी वर्ग व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## बोरगाव कृषि विज्ञान केंद्रातर्फे प्रशिक्षण व शेळी वाटप कार्यक्रम संपन्न



**दि. २८ मार्च, २०२५.** कृषि विज्ञान केंद्र, बोरगावतर्फे आदिवासी विकास प्रकल्पअंतर्गत शेळीपालन प्रशिक्षण व शेळी वाटप कार्यक्रम रायगाव (ता. जावळी) येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा उपआयुक्त डॉ. दिनकर बोर्डे उपस्थित होते. यावेळी डॉ. बोर्डे यांनी शेतकरी व ग्रामस्थांना शेळीपालन व्यवसायाचे महत्त्व तसेच व्यवसाय करत असताना घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले. पंचायत समितीचे विस्तार अधिकारी पशुसंवर्धन डॉ. अनिल चपने यांनी जनावरांचे आजार व्यवस्थापन याविषयी माहिती दिली. पशुधन विकास अधिकारी डॉ. माधव जाधव यांनी विमा संरक्षण व पशुवैद्यकीय दवाखान्यामधून मिळणाऱ्या सेवांबद्दल माहिती दिली. कार्यक्रम समन्वयक डॉ. महेश बाबर यांनी लाभार्थी कुटुंबीयांना शेळ्यांचे योग्य संगोपन करून शेळीपालन व्यवसाय वाढवण्याचे आवाहन केले. रायगावच्या सरपंच श्रीमती हसीना मुजावर यांनी गावामध्ये राबविण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या योजनांची माहिती दिली. उपविभागीय कृषि अधिकारी श्री. संतोष बरकडे यांनी शेळीपालन व नैसर्गिक शेती हे परस्पर पूरक कसे आहेत याविषयी माहिती दिली. विषय विशेषज्ञ प्रा. भूषण यादगिरवार यांनी नैसर्गिक शेती बाबत मार्गदर्शन केले. मंडळ कृषि अधिकारी श्री. संजय घोरपडे यांनी नैसर्गिक शेती योजनेबाबत माहिती दिली. प्रगतशील शेतकरी श्री. जितेंद्र कदम यांनी आपल्या शेतामध्ये राबविण्यात येणाऱ्या प्रयोगांबाबत माहिती दिली. यावेळी रायकातकरी समाज बांधवांना शेळीपालन व्यवसाय करण्यासाठी उस्मानाबादी जातीच्या शेळी व बोकड यांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. प्रा. सागर सकटे यांनी प्रस्ताविक केले. स्वागत श्री. क्षीरसागर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उपसरपंच श्री. समाधान गायकवाड व कृषि सहाय्यक श्री. मोहिते यांनी परिश्रम घेतले.

## कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा



**दि. ८ मार्च, २०२५.** कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळ (MAVIM), मोहोळ यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोळ तालुक्यातील वडवळ येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (MAVIM) स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचाही उत्सव साजरा करण्यात आला. श्री. डी. एन. क्षीरसागर, विषय विशेषज्ञ (अन्न विज्ञान आणि तंत्रज्ञान) यांनी उपस्थित सहभागी व बँक अधिकाऱ्यांना महिला सशक्तीकरण, पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग औपचारिकीकरण योजना (PM-FME) आणि स्वयंसहायता गटांसाठी अन्न प्रक्रिया उद्योगातील संधी याविषयी मार्गदर्शन केले.

## विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांची मोहोळ येथील कृषि विज्ञान केंद्रास भेट





**दि. २७ मार्च, २०२५.** मोहोळ, जि. सोलापूर येथील कृषि विज्ञान केंद्रास महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी भेट देऊन विविध विस्तार कार्यक्रमांचा आढावा घेतला. याप्रसंगी कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. तानाजी वळकुंडे, तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे यांनी कृषि विज्ञान केंद्रामध्ये सुरू असलेले प्रकल्प नैसर्गिक शेती, पंतप्रधान सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना, सी.एफ.एल.डी., सिड हब प्रकल्प, सेंट्रल सेक्टोरल (CBBO) स्कीम अंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी प्रकल्प, जिल्हा कृषि हवामान केंद्र (DAMU) या प्रकल्पांचा आढावा घेऊन त्याबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी त्यांनी सर्व शास्त्रज्ञांद्वारे कामाचा आढावा घेऊन जास्तीत जास्त शेतकरीभिमुख कार्य करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी विद्यापीठाच्या स्तरावरून नवीन प्रकल्प व या केंद्रासाठी आवश्यक असणारे प्रात्यक्षिक युनिट याविषयी प्रस्ताव सादर करून सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली. याप्रसंगी डॉ. तानाजी वळकुंडे यांनी कृषि विज्ञान केंद्रामार्फत राबविलेल्या विविध प्रकल्पांचे सादरीकरण केले. यावेळी डॉ. ससाणे यांनी कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ या ठिकाणी पैदासकार उन्हाळी बियाणे मूग (फुले चेतक) प्रक्षेत्र बियाणे पाहणी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दिनेश क्षीरसागर यांनी तर आभार डॉ. पंकज मडावी यांनी मानले. या बैठकीमध्ये डॉ. विशाल वैरागर, डॉ. स्वाती कदम, काजल म्हात्रे, डॉ. सुरज मिसाळ, श्री. सुयोग ठाकरे, श्री. नरेंद्र जाधव, श्री. ज्ञानेश्वर तांदळे, श्री. संजय बनसोडे व श्री. नितीन बागल इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.

## भाजीपाला सुधार प्रकल्पामध्ये एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न






**दि. २९ मार्च, २०२५.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात अखिल भारतीय समन्वित अखिल भारतीय समन्वित भाजीपाला संशोधन प्रकल्प, उद्यानविद्या विभाग व भारतीय कृषि अनुसंधान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती प्रवर्गासाठी एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम भाजीपाला सुधार प्रकल्पामध्ये संपन्न झाला. या प्रशिक्षणवर्गाचे उद्घाटन वरिष्ठ भाजीपाला पैदासकार तथा उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी.टी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. बी.टी. पाटील यांनी सेंद्रिय भाजीपाला लागवड यावर मार्गदर्शन केले. श्री. योगेश

गागरे यांनी गांडूळ खत निर्मिती यावर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांनी भाजीपाला संशोधन प्रकल्प येथील शेतावर भेट देऊन तेथील विविध प्रकारच्या भाजीपाला पिकावरील नवनवीन प्रयोग व लागवड तंत्रज्ञान याबाबत जाणून घेतले. या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये किट म्हणून शेतकऱ्यांना गांडूळ निर्मिती बेड, सेंद्रिय खते व औषधे व विद्यापीठाचे प्रमुख प्रकाशन कृषिदर्शनी-२०२५ चे वितरण करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये भाजीपाला लागवड तंत्रज्ञान व गांडूळ खत निर्मिती याविषयी तज्ञांनी शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यामध्ये भाजीपाला पिकांचे दैनंदिन आहारातील महत्त्व व त्यांची लागवड विषयक तंत्रज्ञान, माती परीक्षणाचे महत्त्व तसेच जैविक संवर्धन खतांचा उपयोग, भाजीपाला पिकांवरील वरील रोगांची किडींची ओळख व नियंत्रण याबाबत सर्व प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करण्यात आले. या एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये डॉ. बी. टी. पाटील, डॉ. शर्मिला शिंदे, डॉ. शालिग्राम गांगुर्डे, डॉ. कल्पना दहातोंडे, प्रा. चिमाजी बाचकर, प्रा. अमोल क्षीरसागर व श्री. युवराज पवार यांनी मार्गदर्शन केले याप्रसंगी डॉ. शर्मिला शिंदे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व आभार मानले.

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, इगतपुरी येथे शेतकरी प्रशिक्षण व आद्यरेखा पीक प्रात्यक्षिक कार्यक्रम संपन्न





**दि. २८ मार्च, २०२५.** विभागीय कृषि संशोधन केंद्र, इगतपुरी येथील अखिल भारतीय समन्वित खुरासणी संशोधन प्रकल्प व प्रकल्प संचालनालय अखिल भारतीय समन्वित खुरासणी व तीळ संशोधन प्रकल्प, जबलपूर यांचे संयुक्त विद्यमाने आदिवासी उप-योजनेंतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के व जबलपूर येथील अखिल भारतीय समन्वीत खुरासणी संशोधन प्रकल्पाचे प्रकल्प संचालक डॉ. आनंद विश्वकर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली अकोले तालुक्यातील दुर्गम आदिवासी क्षेत्रातील मुरशेत गावात शेतकरी प्रशिक्षण व खुरासणी पिकाच्या आद्यरेखा पीक प्रात्यक्षिके घेतलेल्या शेतकऱ्यांना निविष्ठा वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. हेमंत पाटील होते. यावेळी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन मुरशेतचे सरपंच श्री. सखाराम आसवले, खुरासणी पैदासकार डॉ. दिपक डामसे, उप-सरपंच श्रीमती स्वाती शिंदे, पोलीस पाटील तसेच ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. यावेळी डॉ. हेमंत पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून शेतकऱ्यांना विभागीय संशोधन केंद्राचे कार्य आणि भाताच्या इंद्रायणी वाण तसेच युरिया- डीएपी गोळी खत या विद्यापीठाच्या उत्पादनांचा शेतकऱ्यांनी वापर करण्याचे आवाहन केले.

यावेळी केंद्राच्या शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून खुरासणी, भात, नागली, वरई लागवड तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन, जमिनीचे आरोग्य, मृदा व जलसंधारण इत्यादी विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक खुरासणी पैदासकार डॉ दिपक डामसे यांनी केले. यावेळी डॉ. दिपक डामसे यांनी खुरासणी पिकाचे महत्व आणि लागवड तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन करून खुरासणी पिकाचा पेरा वाढविण्याचे तसेच तेलाचे मूल्य जाणून त्याचा आहारात नियमित समावेश करण्याचे आवाहन शेतकऱ्यांना केले. डॉ. अविनाश कोळगे यांनी भात व उन्हाळी भुईमुग पिकाचे उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर सखोल मार्गदर्शन केले, डॉ. संदीप निकम यांनी उप-पर्वतीय विभागातील मृदा व जलसंधारण, प्रा.रंगनाथ बागुल यांनी नागली व वरई लागवड तंत्रज्ञान व आहारातील महत्व, डॉ. जयपाल चौरे यांनी खुरासणी पिकाचे अन्नद्रव्य व्यवस्थापन, कृषि विभागाचे राजुर मंडळ कृषि अधिकारी श्री. यशवंत खोकले यांनी कृषि विभागातील योजनांची माहिती दिली. यावेळी उपस्थित लाभार्थी शेतकऱ्यांना अ.भा. समन्वित खुरासणी प्रकल्पाच्यावतीने बॅटरीचलित फवारणी पंप, ५० किलो १४:३५:१४ खताची गोणी, ताडपत्री, स्फुरद विरघळविणारे जीवाणू, ट्रायकोडॉर्मा, खुरासणी पीक माहिती पुस्तिका, कृषिदर्शिनी, खुरासणी पिकावरील

तणनाशक इत्यादी निविष्ठा मोफत पुरविण्यात आल्या. सदरील कार्यक्रम यशस्वी करणेसाठी डॉ. दिपक डामसे, कृषि सहायक श्री. प्रवीण लोहकरे, वेधशाळा निरीक्षक श्री. अमित वाघ, श्री. जयराम शेवाळे यांनी परिश्रम घेतले तसेच गावाच्यावतीने श्री. अशोक डोळस यांनी सर्व उपस्थित शेतकऱ्यांच्या सहकार्याने येत्या खरिप हंगामात खुरासणी पिकाचा पेरा वाढविण्याची ग्वाही आपल्या मनोगतामधून व्यक्त केली. डॉ. जयपाल चौरे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी महिला व पुरुष शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जळगाव येथील तेलबिया संशोधन केंद्रातर्फे शेतकरी प्रशिक्षण व पीक पाहणी कार्यक्रम संपन्न



**दि. १३ मार्च, २०२५.** तेलबिया संशोधन केंद्र, जळगाव तसेच भारतीय भुईमुग संशोधन संस्था, जुनागढ यांच्या संयुक्त विद्यमाने अंजनविहिरे, ता. भडगाव, जि. जळगाव येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठात झालेल्या नाविण्यपूर्ण संशोधन पद्धतीच्या प्रचाराबाबत जागरुकता कार्यक्रम या विषयावर शेतकरी प्रशिक्षण व पीक पाहणी कार्यक्रम तेलबिया संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ, डॉ. डी. व्ही. दहात यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. सदर कार्यक्रम तेलबिया संशोधन केंद्राचे सहयोगी प्राध्यापक डॉ. भानूदास गमे यांचे अध्यक्षतेखाली पार पडला. या कार्यक्रमाला तेलबिया संशोधन केंद्राचे अभियांत्रिकीचे विशेषज्ञ श्री. वैभव सूर्यवंशी, कृषिविद्या विभागाचे विशेषज्ञ डॉ. शरद जाधव, कनिष्ठ संशोधन सहाय्यक श्री. संजय नंदनवार, श्री. दिनेश पाटील उपस्थित होते. सदर प्रशिक्षणामध्ये डॉ. भानूदास गमे यांनी पिकावरचे किड, रोग व त्यांचे नियंत्रण याबद्दल सखोल माहिती शेतकऱ्यांना दिली. त्याचबरोबर श्री. दिनेश पाटील यांनी बियाणे प्रक्रियेचे महत्त्व व बिजप्रक्रिया कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. श्री. वैभव सुर्यवंशी यांनी शेतीचे यांत्रिकीकरण या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच डॉ. शरद जाधव यांनी तेलबिया व इतर पिकांचे लागवड तंत्रज्ञान या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संजय नंदनवार यांनी केले. या कार्यक्रमासाठी भडगाव तालुक्यातील पुरुष व महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि विज्ञान केंद्र, जळगावमार्फत पिंपळगाव हरेश्वर ता. पाचोरा येथे शेतकरी मेळावा संपन्न



**दि. २५ मार्च २०२५.** कृषि विज्ञान केंद्र, जळगाव कार्यालयाकडून पिंपळगाव हरेश्वर ता. पाचोरा येथे शेतकरी मेळावा संपन्न झाला. महात्मा

फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. जी. के. ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. हेमंत बाहेती होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र, गुजरात व गोवा येथील भारतीय किसान संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी तथा प्रांत संघटनेचे मंत्री श्री. दादा लाड तसेच बदनापूर येथील मोसंबी संशोधन केंद्राचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. एम. बी. पाटील हे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथि म्हणून जळगावचे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. कुरबान तडवी, जळगाव येथील आत्मा प्रकल्प उपसंचालक श्री. भरत इंगळे, पाचोरा येथील उपविभागीय कृषि अधिकारी श्री. किशोर मांडगे, पाचोरा तालुका कृषि अधिकारी श्री. रमेश जाधव, हरिहरेश्वर फेड पिंपळगाव बु. शेतकरी उत्पादक कंपनी अध्यक्ष श्री. गजानन संभाजी पाटील उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. हेमंत बाहेती यांनी सांगितले की कापूस उत्पादन वाढविण्याकरिता सघन कपाशी लागवड तंत्रज्ञान अत्यंत उपयुक्त ठरत आहे व तसेच या तंत्रज्ञानामुळे कपाशीची काढणी ही नोव्हेंबर महिन्यात होत असल्याने गुलाबी बोंड अळीला अटकाव करण्यास फायदा होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्रयत्नपूर्वक उत्पादनाची पातळी वाढवण्यासाठी प्रयत्न करावा.

यावेळी श्री. कुरबान तडवी यांनी जळगाव जिल्ह्यातील कापसाची सध्यस्थिति मांडली आणि सघन लागवड व दादा लाड तंत्रज्ञानाचा अवलंब करून अधिक उत्पादन घेण्याचे आवाहन केले. श्री. दादा लाड यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या तंत्रज्ञानाबद्दल सखोल मार्गदर्शन करताना कापसाच्या उंचीपेक्षा उत्पादनाची उंची वाढवायची आहे असे सांगितले. सघन लागवडीमध्ये प्रति झाड मर्यादित बोंडसंख्या ठेवून बोंडाचे वजन वाढवले जाते तसेच एकूण झाडांची संख्या वाढल्यामुळे एकरी उत्पादकता वाढते. डॉ. एम. बी. पाटील, डॉ. प्रशांत तायडे, निवृत्त प्रकल्प संचालक आत्मा, जळगाव श्री. अनिल भोकरे, जेष्ठ शेतकरी श्री. उत्तमदादा थोरात यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शरद जाधव यांनी केले. उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते जिल्ह्यातील उच्चांकि कापुस उत्पादकता मिळवलेल्या महिला व पुरुष शेतकऱ्यांचा पुष्पगुच्छ व कृषिदर्शनी देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव सूर्यवंशी यांनी केले तर आभार किरण मांडवडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषि विज्ञान केंद्राचे श्री. किरण जाधव, मयुरी देशमुख, श्री. आशिष पवार, श्री. अक्षय पाटील, श्री. नितीन पाटील, श्री. प्रथमेश वल्हे व श्री. मनोज बोरसे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच कार्यक्रमाच्या प्रसिद्धी व सहकार्यासाठी हरिहरेश्वर फेड पिंपळगाव बु. शेतकरी उत्पादक कंपनीचे श्री. किशोर शिणकर, श्री. गजानन कछवाह, श्री. कर्ण बारी, श्री. राजेंद्र बडगुजर व श्री. विशाल नेव्हे यांचे विशेष सहकार्य लाभले तसेच यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

## कृषि महाविद्यालय व कृषि तंत्र विद्यालयातील विविध उपक्रम

### कोल्हापूर येथील राजश्री छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न






**दि. २१ मार्च, २०२५** रोजी. राजश्री छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय कोल्हापूर येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता तथा विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष डॉ. सतीश बुलबुले होते. यावेळी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. शैलेंद्र कांबळे, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. अजय देशपांडे, शारीरिक शिक्षण निर्देशक प्रा. रामचंद्र बोरसे, क्रीडा समितीचे निमंत्रक कु. सिद्धार्थ कांबळे, पारितोषिक समिती निमंत्रक कु. अपूर्वा तेली व विद्यार्थी परिषद

कार्याध्यक्ष कु. दीपन्या दत्ता व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. सतीश बुलबुले यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक वाटचालीबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी ते महणाले की क्रीडा स्पर्धेचे महत्त्व आपल्या जीवनात अनन्यसाधारण असून क्रीडा स्पर्धेमुळे आपल्या जीवनातील कला गुण जोपासले जातात. यामुळे भविष्यात आपली प्रगती होते. महाविद्यालयात दि. १७ ते १९ मार्च, २०२५ यादरम्यान अंतरवर्ग विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याचबरोबर सांस्कृतिक व कलागुणांना वाव मिळावा म्हणून रांगोळ, चित्रकला, पारंपारिक वेशभूषा अशा स्पर्धेंचेही आयोजन करण्यात आले होते तसेच दि. २० मार्च, २०२५ रोजी विद्यार्थी विविध फूड फन स्टॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या विविध स्पर्धेमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावलेल्या खेळाडुंचा सत्कार यावेळी करण्यात आला. यामध्ये विविध क्रीडा स्पर्धेत विद्यापीठाचे नेतृत्व केलेले असे एकूण ३० खेळाडूंचे व त्यांच्या संघ व्यवस्थापकांचे सत्कार करण्यात आले तसेच विविध क्रीडा स्पर्धेमध्ये विजेता व उपविजेते (मुले /मुली) या संघाला पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावर्षीचे बेस्ट स्टुडन्ट कु. कुशल दादाभाऊ सोनवणे व सर्व उत्कृष्ट राष्ट्रीय स्वयंसेवक म्हणून कु. प्रसाद मधुकर मासाळ यांची निवड करण्यात आली. प्रथम वर्षातील प्रथम येणारा विद्यार्थी अनिल अथिरा, द्वितीय प्रिया कुलकर्णी व कल्याणी माने विभागून, तृतीय दत्ता दिपन्या व चौथा–स्नेहल खरुडे या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी फिनोलेक्स पाईप या कंपनीतर्फे प्रथम येणाऱ्या कु. तुरुकणे अनुजा शरद, नंदना पी. एम. श्रेया शहा या तीन विद्यार्थ्यांची स्कॉलरशिपसाठी निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. शैलेंद्र कांबळे यांनी केले. वार्षिक क्रीडा अहवालाचे वाचन कु. सिद्धार्थ कांबळे यांने केले, विद्यार्थी परिषद अहवाल वाचन कु. दत्ता दिपन्या यांनी तर बक्षीस वितरण अहवाल वाचन कु. अपूर्वा तेली यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. महेक मुजावर व कु. दिव्या कांबळे यांनी केले तर आभार प्रा. अजय देशपांडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुल, काष्टी येथे रक्तदान शिबिर संपन्न



**दि. ५ मार्च, २०२५.** शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुल काष्टी अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजने च्या वतीने संकुलाचे प्रमुख डॉ. एस.बी. नांदगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली संकुलामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संकुलाचे प्रभारी प्रमुख डॉ. एस. पी. सोनवणे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राहुल खुळे यांनी केले. या रक्तदान शिबिराप्रसंगी डॉ. एस. पी. सोनवणे, डॉ. एस. डी. पाटील व श्री. पुष्पक पगार यांनी रक्तदानाचे महत्व व फायदे विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच या कार्यक्रमाप्रसंगी कृषि महाविद्यालयाचे प्रकल्प अधिकारी तथा कुलमंत्री डॉ. एस. डी. पाटील, उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्रकल्प अधिकारी डॉ. डी. आर. बिरारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. राहुल खुळे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. प्रशांत सोनवणे व सेवा ब्लड बँक मालेगावचे श्री. पुष्पक पगार व त्यांचे सहकारी आणि कृषि विज्ञान संकुलातील अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरामध्ये एकुण ७३ विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रकाश तापकीर तसेच आभार प्रदर्शन डॉ. प्रशांत सोनवणे यांनी केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. श्रीराम गोडसे, डॉ. शहाजी कदम, डॉ. प्रवीण पाटील यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये परिश्रम घेतले.

## कृषि महाविद्यालय धुळे, येथील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत श्रमसंस्कार शिबिर संपन्न



**दि. १३ मार्च, २०२५.** कृषि महाविद्यालय धुळे, येथील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत श्रमसंस्कार शिबिर मोठ्या उत्साहाने राबविण्यात आले. सामाजिक बांधिलकीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. या शिबिराचे आयोजन जवाहर शिक्षण प्रसारक संस्थेचे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वडजाई येथे करण्यात आले. या शिबिरात एकूण ७५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी. एम. इल्हे होते. प्रमुख पाहुणे म्हणुन महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीर सिंग चौहान उपस्थित होते. यावेळी सरपंच सौ. मानसी धर्मेश देवरे, उपसरपंच श्री. महेंद्र सूर्यवंशी, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. राहुल देसले, प्राध्यापक डॉ. जितेंद्र सूर्यवंशी, विद्यार्थी कल्याण अधिकारी तथा शिबिराचे कार्यक्रम अधिकारी डॉ. पी. पी. पवार, प्राध्यापक नितीश घोडके व गावातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होते. शिबिर दरम्यान डॉ. बी. एम. इल्हे, डॉ. राहुल देसले, डॉ. जितेंद्र सूर्यवंशी, डॉ. पी. पी. पवार, प्राध्यापक नितीश घोडके यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या शिबिराच्या अंतर्गत सर्व स्वयंसेवकांकडून योगसाधना करून दिवसाची सुरुवात करणे श्रमदानाच्या स्वरूपात स्वच्छता करणे, झाडांना पाणी देणे, व्यसन, साक्षरता, नैसर्गिक ऊर्जा इत्यादी सामाजिक विषयांवर प्रभात फेरी आणि विविध समस्यांवर गावात ठिकठिकाणी पथनाट्यच्या माध्यमातून स्वरूपात जनजागृती करण्यात आली. प्रत्येक दिवशी स्वयंसेवकांसाठी सामाजिक प्रबोधन पर व्याख्याने आयोजित करण्यात आली. यशस्वी आयोजनासाठी कृषि महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी वृंद यांचे मोलाचे सहकार्य ही लाभले.

## कसबे डिग्रज येथील कृषि तंत्र विद्यालयात हळद बेणे निवडीचे प्रात्यक्षिक संपन्न



**दि. २१ मार्च २०२५.** कसबे डिग्रज येथील कृषि तंत्र विद्यालयातील विद्यार्थ्यांना हळद, आले पिकामध्ये बेणे निवड, विविध जातींचे बेणे ओळख, बेणेप्रक्रिया आदी विषयांवर कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज माळी यांनी विस्तृत मार्गदर्शन केले. सध्या विद्यालय प्रक्षेत्रावर हळद बेणे निवडीची लगबग सुरू आहे. या वेळी डॉ. माळी यांनी विद्यार्थ्यांना हळद, आले पिकांतील मातृकंद, अंगठा कंद, हळकुंडे, सोराकंद यांची प्रात्यक्षिकाद्वारे ओळख करून दिली. डॉ. माळी यांनी निरोगी बेणे कसे ओळखावे, त्याचे वजन किती असावे, विविध जातींचे बियाणे कसे

ओळखावे, लागवडीपूर्वी रासायनिक, जैविकं बेणेप्रक्रिया या विषयी माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष बेणे निवड करण्याविषयी प्रात्यक्षिक करून माहिती घेतली. यावेळी श्री. प्रदीप मुर्कीभावी यांनी जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्माचा वापर आणि हळद पिकामध्ये त्याचे फायदे याबाबत माहिती दिली. श्री.प्रज्वल गागरे व श्री. गणेश खंबाईत यांनी विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन केले. श्री. नितीन घोरपडे, श्री. राजू कापसे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. प्रात्यक्षिकामध्ये विद्यालयातील ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत माहिती घेतली.

## जिल्हा कृषि विकास अधिकारी श्री. मनोजकुमार वेताळ यांची कृषि तंत्र विद्यालयास भेट व मार्गदर्शन



**दि. २५ मार्च, २०२५.** कृषि तंत्र विद्यालय, कसबे डिग्रज ता. मिरज येथे जिल्हा कृषि विकास अधिकारी श्री. मनोजकुमार वेताळ यांनी भेट देऊन येथील प्रथम आणि द्वितीय वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांशी चर्चा करून त्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज माळी होते. यावेळी श्री. वेताळ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की देशात कृषि आधारित उद्योगाला मोठे महत्व आहे. त्यामुळे तुम्ही कृषि शिक्षण घेऊन जगाला समृद्धीपार घेऊन जावे. विद्यार्थ्यांना कृषि शिक्षण मातृभाषेतूनच मिळत असल्याने त्यांनी या शिक्षणाचा दर्जेदार उपयोग करावा. केवळ नोकरी हा उद्देश न ठेवता व्यावसायिक शेती करावी. व्यावसायिक स्वरूपातून शेतीतून रोजगार उपलब्ध करून, रोजगारक्षम बनावे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा अवलंब करून पारंपारिक शेतीला फाटा देऊन तंत्रज्ञान व व्यवसाय आधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेती करावी. एका कुटुंबाचा मासिक खर्च हा शेतीतून निघावा अशा पद्धतीने शेतीचे नियोजन करावे. हैद्राबादस्थित मॅनेज या संस्थेमार्फत देखील वेगवेगळ्या शेती पद्धतीचं शिक्षण दिलं जातं ते देखील आत्मसात करावे तसेच केवळ शेती न करता शेतीबरोबरच पूरक व्यवसाय निर्माण केले पाहिजेत असे मार्गदर्शन केले. यावेळेस विद्यार्थी प्रतिनिधी विजय माने, शुभम चव्हाण, सुप्रिया चौगुले यांनी विचारलेल्या शंकांचे निरसन केले. स्वतः ग्राहक बनून बाजार समजून घ्यावा, बाजारात कोणत्या निविष्ठाची मागणी आहे त्यानुसार उत्पादन राबवून तसा पुरवठा करावा जेणेकरून आपल्या मालाला चांगला उठाव मिळेल आणि आपण दोन पैसे मिळू शकतील. बाजारातील प्रक्रिया उद्योग जसे कि आले,लसूण पेस्ट इत्यादी प्रक्रिया उद्योगांचे उदाहरणादाखल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी व्यावसायिक संधी शोधून व्यवसाय करावेत. पंतप्रधान सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगाचे देखील मदत घ्यावी अशा पद्धतीने त्यांनी विद्यार्थ्यांची हितगुज केले. एकात्मिक शेती अभ्यासाचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.

याप्रसंगी डॉ. मनोज माळी यांनी पशुशास्त्र, कुक्कुटपालन, बिजोत्पादन, रोपवाटिका, गांडूळ खत असे कृषि शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांना स्वावलंबी होता येते असे मत व्यक्त केले. श्री. प्रदीप मुर्कीभावी यांनी प्रास्ताविक केले तर आभार प्रदर्शन श्री. प्रज्वल गागरे यांनी केले. श्री. गणेश खांबाईत, श्री. महेश केवले, श्री. नितीन घोरपडे, श्री. राजू कापसे यांनी कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन केले. यावेळी विद्यालयातील ८० विद्यार्थ्यां उपस्थित होते.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन

**दि. ७ मार्च, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थ्यांच्या विविध क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. महाविद्यालयात आयोजित चैत्रपालवी २०२५ क्रीडा आविष्कार स्पर्धेत सांघिक





खेळांमध्ये कबड्डी, खो–खो, हॉलीबॉल, फुटबॉल, क्रिकेट, रस्सीखेच तर वैयक्तिक खेळांमध्ये बॅडमिंटन, टेबल टेनिस, कॅरम, बुद्धिबळ, धावण्याची शर्यत, भालाफेक, थाळीफेक, गोळाफेक, चित्रकला, रांगोळी, वक्तृत्व, निबंध अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे होते. याप्रसंगी विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. दत्तात्रय सोनवणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी उपस्थित होते. कृषि पदवीतील तृतीय वर्षाच्या खेळाडूंनी सर्व सांघिक स्पर्धांमध्ये विजयी होत अव्वल स्थान पटकावले. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. वैयक्तिक व सांघिक स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ वर्षाच्या २८८ विध्यार्थांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तृतीय वर्षातील विद्यार्थी सौरभ कारंडे याने सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार जिंकला. क्रीडा स्पर्धाच्या आयोजनामध्ये प्रभारी शारीरिक शिक्षण निर्देशक डॉ. निलेश लांडे यांनी अथक परिश्रम घेतले. पंच व परीक्षक म्हणून डॉ. प्रेरणा भोसले, डॉ. गोकुळ वामन, प्रा. पोपट पवार, डॉ. विवेकानंद कुलकर्णी, डॉ. मनोज गुड, डॉ. उत्कर्षा गवारे, डॉ. निकिता धाडगे, डॉ. महेश निकम, डॉ. अंबादास मेहेत्रे, प्रा. अर्चना महाजन, डॉ. किरण चौधरी, डॉ. अनिकेत गायकवाड, डॉ. प्रणाली ठाकरे, श्री. महादू शिंदे, शिक्षकेतर कर्मचारी श्री. प्रदीप धारेकर, श्री. सुरेश माकरे, श्री. संभाजी ठवाळ यांनी काम पाहिले. सदर स्पर्धेसाठी श्री. संजय आढाव, श्री. किरण अडसुर, श्री. शशी कांबळे, श्री. संजय सोनवणे, श्री. अनिकेत कुंभार, श्री. मोबिन नदाफ, श्री. अनिकेत मंडलिक, अनिता पुराणे, श्री. गंगाराम रंधवे यांनी मोलाचे सहकार्य केले. सदरच्या स्पर्धा यशस्वीतेसाठी डॉ. दत्तात्रय सोनवणे, डॉ. विवेकानंद कुलकर्णी तसेच इतर प्राध्यापक आणि विद्यार्थी परिषदेचे सभापती श्री. अनिकेत मिंड, संयोजक क्रीडा समिती श्री. सुमित भुजबळ तसेच सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## हाळगाव येथील कृषि महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन






**दि. ८ मार्च, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे जागतिक महिला दिनानिमित्त कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांचे आरोग्य, आहार, विहार व क्ष्मत लसीकरण या विषयावर व्याख्यान

आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. दत्तात्रय सोनावणे होते. यावेळी प्रमुख व्याख्यात्या म्हणुन स्त्रीरोग तज्ञ डॉ. कविता कांबळे उपस्थित होत्या. यावेळी सहयोगी प्राध्यापिका डॉ. प्रेरणा भोसले, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, सहाय्यक प्राध्यापक डॉ. मनोज गुड, डॉ. निकिता धाडगे, डॉ. उत्कर्षा गवारे, प्रा. अर्चना महाजन, डॉ. प्रणाली ठाकरे, डॉ. दिपक वाळूंजकर, शशी कांबळे, शोभा वाळूंजकर शिक्षकेतर कर्मचारी अनिता पुराणे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. कविता कांबळे मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की महिलांनी आपले आरोग्य सशक्त ठेवण्यासाठी आपल्या आहारात सकस व सर्व घटकयुक्त पदार्थ घेणे गरजेचे आहे. आपल्या दैनंदिन जीवनातील समतोल आहार आपल्या शारीरिक व मानसिक सर्व घटकांवर प्रभावी असतो. तसेच महिलांनी त्यांच्या दैनंदिन स्वास्थ्यावर लक्ष दिले पाहिजे. शारीरिक स्वास्थातील बदलांकडे दुर्लक्ष न करता त्यांचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. गर्भ पिशवीच्या कर्करोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून क्क्षत लसीकरण करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थिनींना यावेळी केले. यावेळी डॉ. दत्तात्रय सोनावणे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून महिलांतील अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा गौरव केला. शिक्षण, नोकरी, व्यवसाय क्षेत्रातील विविध आव्हानात्मक संधींना गवसणी घालण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थीनींना संबोधित केले. तसेच महिला सशक्तीकरण करण्यासाठी पुढाकार घ्यावा असा सल्ला दिला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रेरणा भोसले यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थिनी साक्षी मिसाळ व ऋतुजा गावडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान सर्व महिला प्राध्यापिका तसेच सफाई कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुतिका व्यवहारे यांनी तर आभार संस्कृती निथळे यांनी केले. सदर कार्यक्रमास विद्यार्थीनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे चैत्रपालवी २०२५– वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आणि स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन





**दि. २१ मार्च, २०२५.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे चैत्रपालवी २०२५– वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आणि स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन सुप्रसिद्ध व्याख्याते तथा महात्मा फुले कृषि विद्यापीठातील सावित्रीबाई फुले कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. जितेंद्र मेटकर उपस्थित हाते. यावेळी विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. दत्तात्रय सोनवणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, विद्यार्थी परिषद सभापती अनिकेत मिंड, प्रभारी शारीरिक शिक्षण निर्देशक डॉ. निलेश लांडे, सांस्कृतिक कार्यक्रम सल्लागार प्रा. अर्चना महाजन, संयोजक प्राजक्ता कदम, सुमित भुजबख व मृणालिनी सरोते उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. अनिल काळे अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये सहभागी होऊन तंदुरुस्तीकडे लक्ष द्यावे, विविध कलाविष्कारांमध्ये नैपुण्य दाखवावे, आपल्या उत्कृष्ट कामगिरीतून महाविद्यालयाचे, विद्यापीठाचे नाव उज्वल करण्यासाठी प्रयत्नशील राहावे. आपले महाविद्यालय भविष्यात विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच प्रयत्नशील राहील असे आश्वासन त्यांनी दिले. याप्रसंगी प्रा. जितेंद्र मेटकर आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की नैतिक मूल्ये आणि व्यक्तिमत्व विकास हे जीवनाचे दोन महत्वाचे स्तंभ आहेत. हे केवळ वैयक्तिक विकासासाठीच नाही तर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी देखील अत्यावश्यक आहेत. विद्यार्थ्यांनी या दोन

घटकांचा समावेश आपल्या जीवनात करायला हवा, ज्यामुळे आपले जीवन अधिक समाधानकारक आणि यशस्वी होईल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सोनवणे यांनी केले. विद्यार्थी परिषद सभापती श्री. अनिकेत मिंड यांनी विद्यार्थी परिषदेमार्फत घेतलेल्या विविध उपक्रमांचा अहवाल सादर केला. क्रीडा समिती संयोजक श्री. सुमित भुजबळ यांनी क्रीडा उपक्रमांचा अहवाल सादर केला. यावेळी वैयक्तिक व सांघिक स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या २८८ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी सर्व सांघिक स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावत अव्वल स्थान प्राप्त केले. तसेच सौरभ कारंडे याने सर्वोत्कृष्ट खेळाडूचा किताब जिंकला. महाविद्यालयातील प्राध्यापक (कृषि विद्या) डॉ. दत्तात्रय सोनवणे व प्रभारी शारीरिक शिक्षण निर्देशक डॉ. निलेश लांडे यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना विद्यापीठाचे अधिष्ठाता (कृषि) डॉ. सात्ताप्पा खरबडे यांच्या हस्ते गौरवण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रम सल्लागार प्रा. अर्चना महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमधून आपले कलाविष्कार सादर केले. डॉ. उत्कर्षा गवारे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी सुरु केलेल्या सहकार भांडाराचे उद्घाटन प्रा. जितेंद्र मेटकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रणाली ठाकरे, डॉ. उत्कर्षा गवारे यांनी तर आभार प्राजक्ता कदम यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एप्रिल महिन्यातील कामांचा तपशील

### ऊस

- सुरु ऊसासाठी रासायनिक खताचा तिसरा हप्ता हेक्टरी २५ किलो नत्र (५५किलो युरिया) (१.२२पोती) देऊन बाळबांधणी करावी.
- ऊस पिकास १० ते १२ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे. शक्य असल्यास ऊसात पाचटाचे आच्छादन करावे. पाणी कमी असल्यास ऊसाला एक सरी आड पाणी द्यावे.
- सुरू ऊसासाठी एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात संजीवकांच्या तिसऱ्या फवारणीसाठी हेक्टरी ३५० लिटर पाणी लागेल. त्याकरिता जी.ए. ३ जिब्रेलिक ॲसीड (४० पीपीएम) १४ ग्रॅम, ६ बी.ए. : ६ बेन्झिल ॲडेनाईन (४० पीपीएम) १४ ग्रॅम, ३५०० ग्रॅम १९:१९:१९, ८७५ ग्रॅम चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्य व १७५० ग्रॅम सिलिकॉन (सिलिसायलिक ॲसिड) एकत्रित करून उसाच्या पानावर फवारणी करावी.
- खोडकिड या किडीचा फार प्रादुर्भाव झाल्यास शेतात उगवण विरळ दिसते. अशा वेळी एकरी रोपांची संख्या योग्य प्रमाण राखण्यासाठी लागणीबरोबर प्लॉस्टिकच्या पिशव्यांमध्ये अगर प्लास्टीक ट्रे मध्ये पुरेशी ऊसाची रोपे तयार करून योग्य वेळी नांग्या भरण्यासाठी (विरळ जागी) ही रोपे वापरावीत.
- पाचटाचे सरीमध्ये आच्छादन (मल्चिंग) आवश्यक करावे. त्यामुळे देखील खोडकिडीचा प्रादुर्भाव कमी होतो.
- ऊसाला एक ते दीड महिन्यानंतर बाळ बांधणी केल्यास खोडकिडीचे पतंग बाहेर पडल्याने तयार झालेली छिद्रे बंद होण्यास मदत होईल व पतंग बाहेर पडणार नाहीत.
- ऊस लागवडीनंतर ४० ते ५० दिवसांनी ५ फुले ट्रायकोकार्ड प्रति हेक्टर या प्रमाणात साधारणः १० ते १५ दिवसांच्या अंतराने लावावीत.
- खोड किडीच्या नियंत्रणासाठी ऊसाच्या शेतात ट्रायकोग्रामा चिलोनिस ५ ट्रायकोकार्ड १५ दिवसाच्या अंतराने प्रति हेक्टरी व ५ कामगंध सापळे (इ.एस.बी.ल्यूर) शेतात लावावे. आवश्यकता असल्यास क्लोरॅन्ट्रॅनिलीप्रोल ०.४% दाणेदार हे किटकनाशक १८.७५ किलो अथवा फिप्रोनिल ०.३% दाणेदार हे किटकनाशक २५ किलो प्रति हेक्टरी याप्रमाणात सरीमध्ये चळीतून द्यावे. सदरील किटकनाशक वापरतांना १ किलो औषधामध्ये ३ किलो बारीक माती चांगली मिसळावी व कुदळीने अर्धा फुट अंतरावर चळी घेवून माती आड करावे व हलके पाणी द्यावे. सर्व प्रकारच्या ऊस पोखरणाऱ्या किडींसाठी अशा प्रकारचे दाणेदार औषधांची उपाययोजना करावी. तरच आपल्याला चांगल्या प्रकारे परिणाम मिळतो.
- काणी व गवताळ वाढीची बेटे समूळ काढून नष्ट करावीत.
- ऊसासाठी ठिबक सिंचनाचा वापर करावा. ठिबक सिंचनाची सोय असल्यास ५ ते ९ आठवडयांपर्यंत ऊसाच्या वाढीच्या अवस्थेनुसार प्रति हेक्टरी ७० किलो नत्र, ३२ किलो स्फुरद व १४ किलो पालाश तर १० ते १२ आठवडयांपर्यंत प्रति हेक्टरी १०० किलो नत्र, ५१ किलो स्फुरद व ३२ किलो पालाश प्रति हेक्टरी सात दिवसांच्या अंतराने समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.
- ऊस पिकासाठी जास्तीत जास्त क्षेत्रावर शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन पाणी व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करावा.
- ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता कमी आहे अशा ठिकाणी यापुढे पाणी देताना एक आड सरीतुन पाणी द्यावे.
- पाण्याचा ताण पडत असल्यास उभ्या पिकातील खालची पक्व झालेली तसेच वाळलेली पाने काढून ती आच्छादन म्हणून सरीत पसरावी. जेणे करून पाण्याचे बाष्पीभवन कमी होवून जमिनीत ओलावा टिकवून राहण्यास मदत होईल.

- ❖ पिकास पाण्याचा ताण असल्यास लागणीनंतर ६०, १२० आणि १८० दिवसांनी २% म्युरेट ऑफ पोटॅश व २% युरीया यांचे मिश्रण करून पिकावर फवारणी करावी.
- ❖ पाण्याची कमतरता असल्यास बाष्पीभवन कमी करण्यासाठी ६ ते ८% केवोलीन या बाष्परोधकाची फवारणी करावी.
- ❖ ऊस पिक हे तण विरहीत ठेवावे. त्यामुळे उपलब्ध पाण्यासाठी होणारी स्पर्धा कमी होवून ऊस वाढीसाठी उपयुक्त ठरेल.
- ❖ लागवडीच्या ऊस पिकात तसेच खोडव्याच्या पिकास हेक्टरी ५ ते ६ टन पाचटाचे आच्छादन करून प्रती टन पाचटासाठी ८ किलो युरीया, १० किलो सुपर फास्फेट व १ किलो पाचट कुजविणाऱ्या जिवाणूंचा वापर करावा.

### भुईमूग (उन्हाळी)

- ❖ भुईमूग पिकाच्या पानावरील टिक्का व तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास फ्ल्युबेनडॅमाईड ३.५% +हेक्झाकोनॅझोल ५% डब्ल्यु.जी.२५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.

### बागायती कापूस

- ❖ कापूस लागवडीसाठी मध्यम ते भारी, ९० सें. मी. पेक्षा जास्त खोली असणारी व चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. जमिनीचा सामू ६ ते ८.५ पर्यंत असावा.
- ❖ जमिनीची खोल नांगरट करून जमीन उन्हाळ्यात तापू द्यावी.

### गहू

- ❖ धान्य कडक उन्हात वाळवून साठवणूक करावी. साठवणुकीच्या वेळी औषध वापरावे.
- ❖ खरीप नाचणी लागवड
- ❖ शेतीची नांगरट करणे
- ❖ कुळवणी करणे
- ❖ शेतातील धसकटे वेचणे

### फळबाग व्यवस्थापन

- ❖ डाळिंब – पाणी व्यवस्थापनाकडे लक्ष द्यावे. फळ पोखरणाऱ्या अळीचे नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी. तेल्या रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी हंगामी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.
- ❖ सिताफळ – बहार धरलेल्या झाडासाठी पाणी व्यवस्थापन करावे. पिठ्या ढेकूण या किडीचे सर्वेक्षण करुन किड व्यवस्थापन करावे.
- ❖ बोर – बहार ताणावर सोडावी.
- ❖ कागदी लिंबू – उन्हाळ्यात ८–१० दिवसाचे अंतराने पाणी द्यावे. रोगट, किडग्रस्त व वाळलेल्या फांद्याची छाटणी करावी. काळीमाशी : थायोमिथोक्झाम (२५ डब्लु. जी.) १ ते १.५ ग्रॅम /१० लि. पाण्यातून फवारावे. खवले कीड : क्विनॉलफॉस ३० मिली / १० लि. पाण्यातून फवारावे. शेंडेमरः कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम/ १० लि. पाण्यातून फवारावे. मोसंबी व लिंबू बागेमध्ये फांदीमर रोगाच्या नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून एप्रिल महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवडयात फवारणी करावी.
- ❖ पेरू – फळमाशीचे कोष नष्ट करण्यासाठी झाडाभोवती कुदळनी/ नांगरणी करावी.
- ❖ द्राक्ष – खरड छाटणी करावी व वलांडे १% बोर्डो मिश्रणाने धूवून घ्यावे.
- ❖ आंबा – फळे अंड्याच्या आकाराची झाल्यावर फळ पिकांचा वापर करावा.

### भाजीपाला व्यवस्थापन

- ❖ रबी कांद्याचे पीक काढणी अवस्थेत असल्यास तीन आठवडे आधी
- ❖ पिकांचे पाणी तोडावे. त्याचप्रमाणे बुरशीनाशकाचा फवारा द्यावा.

वर्ष :९, अंक क्रं. : ९१, मार्च, २०२५ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

- लसूण पीक काढणी अवस्थेत असल्यास तीन आठवडे आधी पाणी तोडावे व बुरशीनाशकाची फवारणी करावी.
- कांदा पिकाची काढणी करून कांदा ३ ते ५ दिवस शेतात सुकवावा.
- कांद्याची पात कापतेवेळी २.५ ते ३.० सेंमी. पात ठेवून कापावी.
- पात कापलेला कांदा १५ ते २० दिवस सावलीमध्ये सुकवावा व प्रतवारी करून मध्यम आकाराचा कांदा चाळीमध्ये साठवावा.
- लसूण पिकाची काढणी करून पातीसह गड्डया बांधून हवेशीर जागेवर साठवण करावी.
- टोमॅटो पिकाची काढणी ३ ते ४ दिवसांनी करावी.
- उन्हाळी भेंडी पिकाची तोडणी एक दिवस आड करावी.
- गवार पिकाची काढणी करावी.
- वेलवर्गीय भाजीपाल्याची काढणी वेळेवर करावी.
- किड व रोगांचा प्रार्दुभाव आढळून आल्यास तज्ञांच्या सल्यानुसार नियंत्रणाचे उपाय करावेत.
- उन्हाळी टोमॅटो पिकास आधार द्यावा त्यासाठी ताटी पध्दतीचा अवलंब करावा.
- टोमॅटो पीक फुलोरा अवस्थेत असल्यास व तापमान ३५० सें.ग्रे. चे वर गेल्यास फुलगळ व कमी प्रमाणात फळधारणा होते.
- फुलगळ कमी करण्यासाठी व फळधारणेचे प्रमाण वाढवीण्यासाठी एन.ए.ए. या संजीवकाची व बोरॉन या सूक्ष्म अन्नद्रव्याची फवारणी करावी. तसेच टोमॅटोच्या शेताच्या चारही बाजूस व चार ओळीनंतर मक्याच्या दोन ओळी लावाव्यात.
- मिरची व वांगी पिकास खुरपणी करून नत्र खताचा हप्ता द्यावा.

### माती परिक्षण

- माती परिक्षणाचे महत्व: सर्वसाधारणपणे पिकास कर्ब, हायड्रोजन, प्रमाणवायु, नत्र, स्फुरद व पालाश या मुख्य अन्नद्रव्यांची, कॅल्शियम, मॅग्नेशियम, गंधक या दुय्यम अन्नद्रव्यांची तर लोह, मंगल, जस्त, तांबे, बोरॉन मॉलिन्डेनम या सुक्ष्म अन्नद्रव्यांची आवश्यकता असते. यापैकी नत्र, स्फुरद, गंधक, लोह व जस्त या सारख्या अन्नद्रव्यांची कमतरता आढळून आलेली आहे. खतांचा असमतोल वापर यापुढे याचपध्दतीने होत राहिला तर भविष्यात जमिनीचे आरोग्य बिघडणे आणि सुपिकता कमी होवून पिकांची उत्पादकता घटण्याबरोबरच निकृष्ट दर्जाची जमीन पुढील पिढीस हस्तांतरीत करण्याची नामुष्की आपणावर येण्याचा मोठा धोका आहे. यासाठी शेतकऱ्याने स्वत:च्या जमिनीचे माती परिक्षण करुन घेणे आणि त्याच्या तपासणी अहवालानुसार येणाऱ्या शिफारशी प्रमाणे खतांचा वापर करणे व जमिनीचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. त्यामुळे पीक उत्पादनांत वाढ होऊन खताच्या वापरावर होणारा अवाजवी खर्च कमी होणार आहे.
- मातीचा नमुना घेताना घ्यावयाची काळजी
- मातीचा नमुना घेण्यासाठी वापरात येणारी अवजारे उदा. फावडे, कुदळ, घमेले, खुरपी इत्यादी स्वच्छ असावीत.
- मातीचा नमुना पिके काढल्यानंतर परंतू नांगरणी पुर्वी घ्यावा. शक्यतो रब्बी पिकाच्या काढणीनंतर किंवा उन्हाळयात घेतल्यास पृथ:करण करुन परिक्षण अहवाला पेरणीपर्यंत उपलब्ध होतो.
- उभ्या पिकांखालील मातीचा नमुना घ्यावयाचा असेल तर दोन ओळीमधील मातीचा नमुना घ्यावा. परंतु पिकास रसायनिक खत दिले असल्यास तीन महिन्याच्या आत संबधित जमिनीतून माती नमुना घेवू नये.
- निरनिराळ्या जमिनीतील नमुना गोळा करताना वेगवेगळया मातीचे नमुने एकत्र मिसळू नयेत.
- माती नमुना गोळा करताना किंवा प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविताना रासायनिक खतांच्या रिकाम्या पिशव्यांचा वापर करु नये.
- शेतामधील खते साठविण्याची जागा, कचरा टाकण्याची जागा, जनावरे बसण्याची जागा, झाडाखालील जागा, विहिरीजवळ, पाण्याचे पाट व शेताचे बांध इत्यादी जागामधून किंवा जवळून मातीचे नमुने घेवू नयेत.

### मातीचा नमुना घेण्याची पध्दत

- मातीचा नमुना हा त्या शेतातील प्रातिनिधीक स्वरुपाचा असणे आवश्यक आहे. एक हेक्टर क्षेत्रातील १५ सेंमी खोलीपर्यतच्या मातीचे वजन अंदाजे २२,४०,००० किलो ग्रॅम असते. यातून काढावा लागणारा ५०० ग्रॅम मातीचा नमुना प्रतीनिधीक होण्यासाठी किती काळजीपुर्वक घ्यावा लागेल याची कल्पना येते. कारण यामधून केवळ काही ग्रॅम माती तपासणीसाठी वापरली जाते व तिच्या तपासणीच्या निष्कर्षावर आधारित खताच्या शिफारशी केल्या जातात. म्हणून मातीचा नमुना काळजीपुर्वक काढावा.
- मातीचा नमुना काढण्यासाठी शेतात गेल्यानंतर प्रथम शेतीची पाहणी करावी व जमिनीच्या प्रकारानुसार वनस्पती/ पिकांचा रंग, वाढ भिन्न भिन्न असते, तसेच जमिनीच्या पृष्ठभागवरचा रंग देखील वेगवेगळा असतो. उतारवरील जमीन भुरकट रंगाची असते, सखल

भागातील काळी असते म्हणूनच उतार रंग, पोत, खोली, व्यवस्थापन व पीक पध्दतीनुसार विभागणी करावी आणि प्रत्येक विभागातून स्वतंत्र्यरित्या वेगळा प्रातिनिधीक नमुना घ्यावा.

१) एक सारख्या जमिनीतून नमुना घेताना काडी कचरा, गवत, पिकांची धसकटे व मुळे काढून टाका.

२) जिथे पिकाची ओळीत पेरणी केली असेल अशा ठिकाणी दोन ओळीमधून नमुना घ्या.

३) नुकतेच खते टाकलेल्या जमिनी खोलगट भाग, पाणथळ जागा, झाडाखालील जमीन, बांधजवळील जागा, शेणखताच्या ढिगाऱ्या जवळील जागा, शेतातील बांधकामा जवळील परिसर कंपोस्ट खताच्या जवळपासची जागा अशा ठिकाणातून मातीचा नमुना घेवू नका.

४) सपाट पृष्ठभाग असलेल्या जमिनीवर इंग्रजी त अक्षराप्रमाणे १५ ते २० सेंमीचा खड्डा घेऊन आतील माती बाहेर काढून टाका. खड्ड्याच्या सर्व बाजुची २ सेमी जाडीची माती खुरप्याच्या सहाय्याने वरपासून ते खालपर्यंत खरडून हातावर काढा आणि प्लॅस्टीकच्या बादलीत टाका. अशारितीने एका प्रभागातून १० नमुने घेऊन त्याच बादलीत टाका.

५) सर्व माती एका स्वच्छ प्लॅस्टीकच्या कागदावर टाका, चांगली मिसळा, ओली असल्यास सावलीत वाळवा नंतर हया ढिगाचे चार समान भाग करा. समोरासमोरील दोन भाग काढून टाका. उरलेले दोन भाग एकत्र मिसळा व पुन्हा चार भाग करा. हि प्रक्रिया एक किलो ग्रॅम माती शिल्लक राहीपर्यंत करा.

❖ मातीचा ढीग

| | |
|---|---|
| १ | २ |
| ४ | ३ |

समोरासमोरील २ व ४ भाग काढून टाका.
नंतर १ व ३ भाग एकत्र मिसळा.

६) उरलेली अंदाजे एक किलो माती स्वच्छ पिशवीत भरा. पिशवीत माहिती पत्रक टाका व एक लेबल पिशवीला बांधा.

७) शक्य तितक्या लवकर नमुने प्रयोगशाळेत पाठवा सर्वसाधारणपणे नमुना काढणे व प्रयागशाळेत पाठविणे ह्यात दोन आठवडयापेक्षा अधिक काळ नसावा. अन्याथा माती पृथ:करण बदलण्याची शक्यता आहे.

८) फळबागेसाठी मातीचा नमुना वेगवेगळया थरामधून घ्यावा उदा. खड्डा खोदून पहिल्या एक फुटातील ३० सेमी पर्यत, मुरुम नसल्यास ३० ते ६० सेमी थरातील दुसरा थर व खोल जमिनीत ६० ते ९० सेमी पर्यत खोलीतील तिसऱ्या थरातील मातीचे नमुने स्वतंत्र घ्यावे व प्रयोग शाळेत पाठवावे.

९) जमीन क्षारयुक्त व क्षारयुक्त– चोपण असल्यास पृष्ठभागवरील दोन सेमी मधील क्षार बाजूला करुन नंतरच नमुना घ्यावा.

१०) सुक्ष्म अन्नद्रव्ये तपासणी करावयाची असल्यास लाकडी खुंटी अथवा लाकडी औजाराने मातीचा नमुना घ्यावा कोणत्याही परिस्थितीत लोखंडी अथवा अन्य धातुंची अवजारे अथवा उपकरणे, माती नमुना घेण्यासाठी वापरु नका. नमुना स्वच्छ पिशवीत भरुन सुक्ष्म अन्नद्रव्यांसाठी माती नमुना घेताना जास्तीत जास्त काळजी घेण गरजेचे आहे. पिशवीवर सुक्ष्मअन्नद्रव्ये तपासणीसाठी नमुना अशी नोंद करावी.

❖ मातीचे नमुना कोठे व कसा पाठवावा

❖ मातीचे नमुना घेतल्यानंतर खालील माहिती लिहून ती, मातीचा नमुना असलेल्या पिशवीत टाकावी, मातीचा नमुना लवकरात लवकर जवळच्या शासकीय कृषि महाविद्यालये अथवा प्रमुख, मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभाग, मफुकृवि, राहुरी यांच्या माती परिक्षण प्रयोगशाळेत सशुल्क तपासण्यात येतील.

❖ १. शेतकऱ्यांचे पुर्ण नांव २. पुर्ण पत्ता
❖ ३. गट नंबर / सर्व्हे नं. ४. बागायत / कोरडवाहु
❖ ५. ओलीताचे साधन ६. जमिनीचा निचरा
❖ ७. जमिनीचा प्रकार ८. जमिनीचा उतार
❖ ९. जमिनीची खोली १०. नमुना घेतल्याची तारीख
❖ ११. मागील हंगामात घेतलेले पीक व त्याचे उत्पादन, वापरलेली खते व त्यांचे प्रमाण
❖ १२. पुढील हंगामात घ्यावयाची पिके, त्यांची जात व अपेक्षित उत्पादन.

- **विविध दुग्धजन्य प्रक्रिया पदार्थ**
- देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रात देशी गाईच्या दुधापासून तूप, बासुंदी, खवा, पनीर, दही, लस्सी, श्रीखंड, गुलाबजामुन इ. दुग्ध पदार्थ बनवले जातात.
- व्यावसायिकदृष्ट्या देशी गाईच्या दुधापासून विविध हंगामी फळांच्या गराचा वापर करून ''इन्स्टंट आईस्क्रीम'' बनवून विक्री केले जाते. ''सॉफ्टी'' देखील या केंद्रात बनवले जाते.
- देशी गाईच्या दुधापासून दक्षिण भारतातले विविध प्रकारचे पायसम, दहीभात, कढी, थिरातुप्पल, फिरनी तर उत्तर भारतातील पूर्व राज्यातील अनेक मिठाया, मिष्टी दही, खुरचन किंवा छन्यापासून बनवण्यात येणारा राजभोग, चमचम, संदेश, छन्ना मूर्की , खीर मोहन तसेच गुलाबजामुन सारखेच असणारे परंतु थोडे वेगळे प्रकार उदा. पंतूवा, लाल मोहन, काला जामुन, खवा जिलेबी, सीताभोग, ओडिशात प्रचलित असलेला छन्ना पोडो, जम्मू भागातील कलारी, कर्नाटकातला खव्यासारखाच थोडा वेगळा पदार्थ कुंदा इ. खास देशी दुग्धपदार्थ बनवता येतील.
- देशी गाईच्या दुधापासून जर्मनी येथील खास देशी दुग्ध पदार्थ ''क्वॉर्ग चीज'' वर ही संशोधन या केंद्रात सुरू आहे.

- **विविध राज्यातील प्रसिद्ध देशी पदार्थ**

| पदार्थ | प्रदेश | पदार्थाचे थोडक्यात वर्णन |
|---|---|---|
| कच्चा गोला | बंगाल, बांगलादेश (नाटोरा जिल्हा) | बंगालमधील संदेशासारखा पदार्थ : परंतु जास्त आर्द्रता, रवाळ पोत, गोड आल्हाददायक चव. |
| धारवाडी पेढा | धारवाड, कर्नाटक | मऊ, तपकिरी रंग, बारीक कणांचा, पिठीसाखरेचा थर दिला जातो. |
| सेकरम | सिक्कीम, नेपाळ, तिबेट, अरुणाचल प्रदेश | ताकापासून, उकळून पाणी काढून घेऊन जो घन पदार्थ उरतो तो सेकरम. लगेच खाल्ला जातो किंवा अनेक महिने नैसर्गिकरित्या आंबवण्यासाठी ठेवतात. |
| साटोरी | मराठवाडा | खव्यात साखर मिसळून गोळ्यात रवा भरुन तो तळून घेतात. तपकिरी लालसर रंग |
| कराड खीर | महाराष्ट्र | भाजलेली करडई, दूध, तांदूळ वापरुन बनवलेली खीर |
| माही/मोही | सिक्कीम | ताकासारखेच परंतु जास्त फॅट, नैसर्गिकरित्या आंबवलेला पदार्थ (लॅक्टिक ॲसिड बॅक्टेरिया). |

प्रकाशक : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण
प्रमुख संपादक : **डॉ. सचिन सदाफळ**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
सहसंपादक : **श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र
डिझाईनर : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक-नि-टंकलेखक, प्रसारण केंद्र
मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७८२/२०२५